POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१७१ ● मुंबई, गुरुवार, २२ जानेवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## ‘तिसरी मुंबई’साठी थेट दावोसमधून गुंतवणूक

### सीएम फडणवीसांच्या पुढाकारानं रायगडमधील ‘या’ भागाच्या विकासाला आणखी वेग

**या MoU मध्ये समाविष्ट असणाऱ्या महत्त्वाच्या कंपन्या, खालीलप्रमाणे...**

- हानव्हा ग्रुप, कोरिया प्रजासत्ताक
- एसएसबी सॉअरवेन आणि स्केफर बाएयू एजी, स्वित्झर्लंड
- एएनएसआर ग्लोबल कॉर्प. प्रायव्हेट लिमिटेड, यूएसए
- फेडएक्स, यूएसए
- रिव्हररिसाइकल, फिनलंड/भारत
- एमजीएसए रियल्टी प्रायव्हेट लिमिटेड, दुबई, यूएई, भारत
- एसजीएसए स्पेसेस होल्डिंग प्रायव्हेट लिमिटेड, सिंगापूर/भारत
- मॅपल ट्री, सिंगापूर/भारत
- ट्रिबेका डेव्हलपर्स एलएलपी, यूएसए/भारत
- जे अँड वी इन्फ्रास्ट्रक्चर, सिंगापूर/भारत
- इंडोस्पेस पार्क एव्हरस्टोन ग्रुप सिंगापूर, सिंगापूर/भारत

वरील गुंतवणूक चर्चांशिवाय दावोसमध्ये फिनलँडचे परराष्ट्र व्यापार आणि विकास मंत्री विले तावियो यांची भेट मुख्यमंत्री फडणवीसांनी घेतली. दोघांनी अर्थव्यवस्थेत सहकार्य, नवे उपक्रम आणि प्रगत तंत्रज्ञान मजबूत करण्याबाबत चर्चा केली. यावेळी सुपरकॉम्प्युटिंग, डेटा सेंटर आणि प्रगत तंत्रज्ञानातील सहकार्य, नोकियाचे आगामी डेटा सेंटर हे महत्त्वाचे मुद्दे ठरले. याशिवाय राज्याच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाद्वारे फिनलँडच्या जागतिक स्टार्टअप महोत्सवात महाराष्ट्राच्या सहभागाबाबतही संवाद झाला. या संवादामुळे फिनलँड-भारत संबंध अधिक दृढ होतील, जिथं महाराष्ट्र महत्त्वाची भूमिका बजावेल असा विश्वास फडणवीसांनी व्यक्त केला.

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

सातासमुद्रापार असणाऱ्या स्वित्झर्लंडमधील दावोस इथं सुरू असणाऱ्या वर्ल्ड इकोनॉमिक फोरममध्ये सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीसुद्धा हजेरी लावली आहे. या फोरममधील विविध कार्यक्रमांमध्ये व्यग्र असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३उच्या माध्यमातून पुणे ग्रँड टूर २०२६ मध्येही सहभाग यगेतला. या ऐतिहासिक क्रीडा स्पर्धेची मजा देवेंद्र फडणवीस यांनी ऑनलाईन घेतली. जागतिक दर्जा टिकवत महाराष्ट्राने स्थानिकांनाही संधी मिळाली अशी भावना देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. दरम्यान फडणवीसांच्या या दोवास दौऱ्यातून आणखी एक महत्त्वाचं वृत्तही समोर आलं, जिथं तिसरी मुंबई म्हणून समजल्या जाणाऱ्या रायगड जिल्ह्यातील एका महत्त्वाच्या भागाच्या विकासासाठी परदेशातून मोठी गुंतवणूक राज्यात येण्यासाठीची वाट मोकळी झाल्याचं स्पष्ट झालं. दावोसमध्येच एमआयटी मीडिया लॅबच्या कार्यकारी संचालक जेसिका रोसेनवॉर्सेल यांच्याशी चर्चा करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी केली भारतातील डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांच्या परिवर्तनकारी भूमिकेवर चर्चा केली. यातून सर्वसमावेशक प्रशासनाला कशी मदत होत आहे याकडेही त्यांनी लक्ष वेधलं. थोडक्यात दावोसमध्ये सध्या महाराष्ट्राचा डंका असून, पहिल्या दिवशीसुद्धा या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये लाखो कोटींचे करार झाल्याचे पाहायला मिळाले.



**रायगड, पेण ग्रोथ सेंटरसाठी मोठी गुंतवणूक!**

दावोस येथे सुरू असणाऱ्या वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम 2026 मध्ये महाराष्ट्र सरकारनं मोठं यश मिळवलं असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये रायगड, पेण ग्रोथ सेंटरसाठी महत्वाच्या MoU वर स्वाक्षरी झाली आहे. या टङ्खव च्या माध्यमातून रायगड पेणला ३थर्ड मुंबई३ म्हणून विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे. हे नवीन शहर तंत्रज्ञान, फिनटेक, डेटा सेंटर्स आणि भारतातील पहिले समर्पित ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर जिल्हा म्हणून उदयास येईल. नवीन मुंबई विमानतळाजवळ असलेले हे केंद्र उच्च दर्जाच्या नोकऱ्या आणि आर्थिक वाढीचा स्त्रोत म्हणून या जिल्ह्याकडे पाहिलं जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या टङ्खव च्या स्वाक्षरीचे साक्षीदार राहून जागतिक कंपन्यांना रायगड पेण ग्रोथ सेंटरमध्ये गुंतवणूक करण्याचं खुलं आमंत्रण दिलं. हे प्रकल्प महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला नवी दिशा देणारे ठरतील आणि लाखोंच्या संख्येनं प्रत्यक्ष, तसंच अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करतील हेच आता स्पष्ट होत आहे. या संधीच्या माध्यमातून महाराष्ट्र सरकार जागतिक स्तरावर गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचं पाहायला मिळत आहे.



**‘स्वतःचं मत कुठे गेलं?’ ची पोस्ट व्हायरल**
**जळगावातील महिला उमेदवाराला खरंच शून्य मतं?**

जळगाव महानगरपालिका निवडणुकीतील अपक्ष महिला उमेदवार सुनंदा भागवत फेगडे यांना शून्य मतदान झाल्याची एक पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. 'सुनंदा यांचं स्वतःचं मत कुठे गेलं?' असा सवाल विचारत एश्ट मशीनवर शंका उपस्थित करणारी ही पोस्ट आहे. तथापि, व्हायरल होत असलेल्या पोस्टबाबत आता महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

**काय आहे सत्य?**

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या पोस्टसोबत उमेदवारांची नावे आणि त्यांना मिळालेल्या मतांच्या आकडेवारीचा एक फोटो व्हायरल होत आहे. त्यात सुनंदा भागवत फेगडे यांच्या नावासमोर शून्य मते लिहिलेली स्पष्ट दिसतात. याद्वारे, 'सुनंदा यांचं स्वतःचं मत कुठे गेलं?' असा सवाल विचारला जात होता आणि ईव्हीएमवर शंका उपस्थित करणारी पोस्ट करण्यात आली होती. मात्र, व्हायरल पोस्टसोबत जोडलेली आकडेवारी ही पोस्टल मतांची असल्याचं समोर आलंय. म्हणजे सुनंदा फेगडे यांना पोस्टल मतदान शून्य झालं होतं. तर, ईव्हीएम मतदानात सुनंदा फेगडे यांना ९२ मते मिळाल्याचेही स्पष्ट झाले आहे.

## मुंबईत रेल्वे स्थानकांवर मोठे बदल!

### २१८४ कोटींचा खर्च, भुयारी मार्ग, १६ पूल, नवे प्लॅटफॉर्म... कुठे?

■**मुंबई । प्रतिनिधी,**

पश्चिम रेल्वेनं बोरिवली ते विरार मार्गाचा विस्तार करण्याचं काम सुरू केलं आहे. या कामातील पहिला टप्पा कांदिवली ते बोरिवलीदरम्यान पाचव्या आणि सहाव्या मार्गिकेचं काम हाती घेतलं होतं. त्यासाठी महिनाभर ब्लॉक लागू केला होता. ते काम पूर्ण झालं असून, आता पश्चिम रेल्वेनं या कामातील दुसरा टप्पा सुरू केला आहे. पश्चिम रेल्वेच्या अनेक स्थानकांवर मोठे बदल करण्यात येणार आहेत.

पश्चिम रेल्वेच्या या प्रकल्पाचं उद्द्येश्य लांब पल्ल्याच्या गाड्यांना उपनगरीय लोकल गाड्यांपासून वेगळे करणं आहे. यामुळे उपनगरीय लोकल आणि एक्सप्रेस गाड्यांसाठी स्वतंत्र मार्गिका तयार केली जाणार आहे. यामुळे मुंबईकरांचा रेल्वे प्रवास सुलभ होणार आहे. या २६ किलोमीटरच्या पट्ट्यात, दहिसर, भाईदर, नायगाव आणि विरार यांसारख्या अनेक स्थानकांचं स्थलांतर करण्यात येणार आहे. धीम्या मार्गाचे फलाट नवीन मार्गांना सामावून घेण्यासाठी बदलले जातील. प्रत्येक स्थानकांवर कोणते बदल केले जाणार आहेत हे जाणून घ्या...

प्रकल्पाचा अंदाजित खर्च २१८४ कोटी रुपये असून तो २०२८ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य आहे. बोरीवली ते विरारपर्यंतच्या संपूर्ण पट्ट्यात विद्यमान मुख्य मार्गाच्या पश्चिम बाजूला दोन नवीन मार्गिका बांधल्या जातील. या बांधकामामध्ये तीन मोठे पूल, १६ लहान पूल, एक भुयारी मार्ग आणि दोन महत्त्वाचे पूल बांधले जाणार आहेत. विशेषतः वसई खाडीवरील पूल क्रमांक ७३ आणि ७४ यांचा ही विकास केला जाणार आहे. पूल क्रमांक ७३ च्या पायाभरणीचं काम सुरू झाले आहे आणि भाईदरजवळील एक जुना ऐतिहासिक पूल पाडला जात आहे.



भायंदर आणि वसई स्थानकांवर मोठ्या प्रमाणावर पुनर्रचना केली जाणार आहे. यामध्ये नवीन प्लॅटफॉर्म बांधणे आणि सध्याच्या प्लॅटफॉर्मचा पुनर्वापर करणे यांचा समावेश आहे. दहिसर, मीरा रोड, नायगाव आणि नालासोपारा यांसारख्या इतर स्थानकांवरही सुधारणा केल्या जातील आणि नवीन प्लॅटफॉर्म बांधले जातील. दहिसरचे फलाट उत्तरेकडे, भाईदरचे पश्चिमेकडे आणि विरारचे थोडे दक्षिणेकडे सरकवले जातील.

## इंस्टाग्राम युजर्स सावधान!

### डार्क वेबवर विकला जातोय तुमचा प्रायव्हेट डेटा



■**मुंबई । प्रतिनिधी,**

जर तुम्ही दररोज इंस्टाग्राम वापरत असाल मग रिल्स पाहत असाल, पोस्ट करत असाल,किंवा फक्त मेसेजसाठी वापरत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. कारण इंस्टाग्राम युजर्सचा प्रायव्हेट डेटा लीक झाला आहे. एका सायबर रिपोर्टनुसार इंस्टाग्रामशी संबंधित सुमारे १ कोटी ७५ लाख युजर्सची माहिती डार्क वेबवर विकली जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. या बातमीमुळे सोशल मीडिया वापरणाऱ्या लाखो लोकांमध्ये आपल्या अकाऊंटच्या सुरक्षेबाबत भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. लीक झालेल्या डेटामध्ये काय आहे तर रिपोर्टनुसार, या लीक झालेल्या डेटामध्ये इंस्टाग्राम युजर्सचे युजरनेम, ईमेल आयडी, मोबाईल नंबर आणि काही प्रकरणांमध्ये लोकेशनशी संबंधित माहिती समाविष्ट असल्याचं सांगितलं जात आहे. ही माहिती एकत्रितपणे मिळाल्यास सायबर गुन्हेगारांसाठी कोणाचंही अकाऊंट हॅक करणं सोपं होऊ शकतं. युजर्ससाठी धोका नेमका काय? जर तुमचा ईमेल किंवा फोन नंबर सायबर गुन्हेगारांच्या हाती लागला, तर ते इंस्टाग्राम किंवा ‘मेटा’ च्या नावाने खोटे पण अगदी खरे वाटणारे मेल आणि मेसेज पाठवू शकतात. या माध्यमातून तुमच्याकडून पासवर्ड, ओटीपी किंवा लॉगिन माहिती चोरण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. यालाच फिशिंग अटॅक म्हटलं जातं आणि सध्या याच प्रकारच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचं अनेक ठिकाणी पाहायला मिळतंय. तुमचं अकाऊंट धोक्यात आहे की नाही कसं ओळखाल? जर तुम्हाला इंस्टाग्राम कडून वारंवार पासवर्ड बदलण्याचे मेल येत असतील, लॉगिन हिस्ट्रीमध्ये ओळखीचं नसलेलं डिव्हाइस दिसत असेल, किंवा अकाऊंटमध्ये अनोळखी ॲक्टिव्हिटी जाणवत असेल तर तुम्हाला सावध होण्याची गरज आहे.

## ब्रास पंचधातूच्या वस्तूंची चोरी... तिघांना अटक



■**पेण। प्रतिनिधी,**

पेण नगरपरिषद येथील इंडोअर गेम हॉलमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यासाठी ठेवलेल्या १ लाख २१ हजार ९०० रुपये किमतीच्या ब्रास पंचधातूच्या वस्तूंची चोरी केल्याप्रकरणी पेण पोलिसांनी तिघांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये विलास चव्हाण (२१) आणि राम विजय गवळी उर्फ रामा रेड्डी (३७) या दोघांचा समावेश असून ते आयटीआय कॉलेजच्या बाजूला असलेल्या झोपडपट्टीतील रहिवासी आहेत. याबाबत सविस्तर माहिती अशी की, शहरात बसविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे काम सध्या पेण नगरपालिकेच्या इंडोअर गेम हॉलमध्ये सुरू आहे. या पुतळ्यासाठी लागणाऱ्या ब्रास पंचधातूच्या वस्तू पहाटेच्या सुमारास गोडाऊनमधील उघड्या खिडकीतून आत प्रवेश करून अज्ञात इसमाने चोरी करून नेल्या होत्या. या प्रकरणी चिंचपाडा येथील फियार्दीने पेण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या गुन्ह्याचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल आणि पोलीस निरीक्षक संदीप बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण कक्षाने सुरू केला. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त बातमीदारांच्या माहितीच्या आधारे संशयितांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपी विलास चव्हाण व राम विजय गवळी उर्फ रामा रेड्डी तसेच त्यांच्या तिसऱ्या साथीदाराने सदर चोरीसह यापूर्वीही चोरी केल्याची कबुली दिली असून, चोरी गेलेला माल पोलिसांनी हस्तगत केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक आंचल दलाल आणि अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.



## चेंबूरमध्ये एलपीजी गॅस टँकर थेट रेल्वे रुळावर उलटला अन्...परिसरात खळबळ

■**मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबईतील चेंबूर परिसरात आज दुपारी एका एलपीजी गॅस टँकरचा भीषण अपघात झाला. बी. डी. पाटील मार्गावरील सर्विस रोडवरून जात असताना हा टँकर अचानक अनियंत्रित होऊन थेट रेल्वे रुळावर कोसळला. सुदैवाने, या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी, टँकरमधून वायू गळती सुरू झाल्याच्या संशयामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी चेंबूरच्या बी. डी. पाटील मार्गावरून हा गॅस टँकर जात होता. चालकाचे नियंत्रण सुटल्याने टँकर रस्त्यावरून खाली घसरून रेल्वे रुळावर जाऊन उलटला. ज्या ठिकाणी हा अपघात झाला, तो रूळ मालवाहू रेल्वेच्या वाहतुकीसाठी वापरला जातो. अचानक रेल्वे मार्गावरच टँकर उलटल्याने मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता निर्माण झाली होती. टँकर उलटल्यानंतर आजूबाजूच्या परिसरात गॅसचा उग्र वास पसरला. स्थानिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली असता, टँकरमधून वायू गळती होत असल्याचे निदर्शनास आले. यामुळे चेंबूर परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, प्रशासनाने सुरक्षेच्या कारणास्तव नागरिकांना घटनास्थळापासून लांब राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**प्रशासकीय यंत्रणा आणि अग्निशमन दल सतर्क**

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. वायू गळती रोखण्यासाठी आणि टँकर रेल्वे रुळावरून बाजूला करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. अग्निशमन दलाचे जवान पाण्याचे फवारे मारून परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. टँकर नेमका कशामुळे उलटला, याचा तपास पोलीस करत आहेत.

## इकडं अश्लील चाळे करतानाचा व्हिडीओ व्हायरल होताच डीजीपी निलंबित

### तिकडं स्मगलिंग प्रकरणात लेक आधीच तुरुंगात



दरम्यान, या प्रकरणामुळे रामचंद्र राव यांचं वैयक्तिक आयुष्यही चर्चेत आलं आहे. एका बाजूला कथित अश्लील व्हिडीओ प्रकरणामुळे त्यांना निलंबनाला सामोरं जावं लागलं असताना, दुसऱ्या बाजूला त्यांच्या मुलीवर स्मगलिंगप्रकरणी कारवाई होऊन ती आधीच तुरुंगात असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे एकाच कुटुंबाशी संबंधित दोन गंभीर प्रकरणांमुळे राज्यभरात तीव्र चर्चा रंगली आहे. आता या प्रकरणाची चौकशी काय निष्कर्ष काढते, याकडे संपूर्ण कर्नाटकचं लक्ष लागलं आहे. चौकशी अहवालानंतर पुढील कारवाई निश्चित होणार असल्याचं सरकारनं स्पष्ट केलं आहे.

■**मुंबई । प्रतिनिधी,**

सोशल मीडियावर कथित अश्लील व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर राज्यातील वरिष्ठ आयपीएस अधिकारी आणि डीजीपी रामचंद्र राव यांना निलंबित करण्यात आलं आहे. रामचंद्र राव हे कर्नाटकमध्ये डीजीपी (सिव्हिल राइट्स एन्फोर्समेंट) या महत्त्वाच्या पदावर कार्यरत होते. व्हायरल झालेल्या व्हिडीओंमुळे प्रशासकीय आणि राजकीय वतुर्ळात एकच खळबळ उडाली.

सोशल मीडियावर सोमवारी काही व्हिडीओ क्लिप्स मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्या. या व्हिडीओंमध्ये रामचंद्र राव वेगवेगळ्या महिलांसोबत कथितपणे अश्लील चाळे करताना दिसत असल्याचा दावा करण्यात आला आहे. हे व्हिडीओ समोर येताच राज्य सरकारनं तात्काळ दखल घेत कठोर पाऊल उचलत राव यांना निलंबित करण्याचा निर्णय घेतला. प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता सरकारनं चौकशीचे संकेतही दिले आहेत.

**व्हिडीओ पूर्णपणे बनावट, प्रतिमा मलिन करण्याचा कट, राव यांचं स्पष्टीकरण**

दरम्यान, रामचंद्र राव यांनी आपल्यावरील सर्व आरोप स्पष्टपणे फेटाळून लावले आहेत. हे सर्व व्हिडीओ पूर्णपणे बनावट असून, त्यांचा या प्रकाराशी काहीही संबंध नाही, असा दावा त्यांनी केला आहे. व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर ते कर्नाटकचे गृहमंत्री जी. परमेश्वर यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी पोहोचले होते. मात्र, त्यांची प्रत्यक्ष भेट होऊ शकली नाही.

गृहमंत्र्यांच्या घराबाहेर माध्यमांशी बोलताना राव म्हणाले, “मी पूर्णपणे हादरून गेलो आहे. हे व्हिडीओ खोटे आणि बनावट आहेत. आजच्या काळात कोणाचाही फेक व्हिडीओ तयार करता येतो. माझी प्रतिमा मलिन करण्यासाठी हा कट रचण्यात आला असण्याची शक्यता आहे.” त्यांनी पुन्हा एकदा ठामपणे सांगितलं की, या व्हिडीओंशी त्यांचा कोणताही संबंध नाही.

व्हिडीओ जुने असण्याच्या चर्चेवरही रामचंद्र राव यांनी प्रतिक्रिया दिली. १९९३ बॅचचे आयपीएस अधिकारी असलेल्या राव यांना जेव्हा विचारण्यात आलं की हे व्हिडीओ जुने असू शकतात का, तेव्हा त्यांनी सांगितलं की, जर जुने असल्याचा मुद्दा धरला, तर सुमारे आठ वर्षांपूर्वी, बेलगावी येथे पोस्टिंग असताना हा काळ असू शकतो. मात्र, तरीही त्यांनी पुन्हा स्पष्ट केलं की या व्हिडीओंशी आपला काहीही संबंध नाही.

या संपूर्ण वादावर कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनीही कडक भूमिका घेतली आहे. त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. “आज सकाळी मला या प्रकरणाची माहिती मिळाली. संबंधित व्यक्ती कोणत्याही पदावर का असेना, कायद्यापेक्षा कोणीही मोठं नाही. आम्ही चौकशी करू आणि त्यानंतर योग्य ती कारवाई केली जाईल,” असं मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी स्पष्ट केलं.

## कॉन्स्टेबलचा पत्नीशी वाद, बायकोवर केला तव्याने हल्ला

### लेकीची हत्या करून नदीत उडी मारत स्वतःला संपवलं

**पतीकडून बायकोवर तव्याने हल्ला**

शिवानीवर तव्याने हल्ला केल्यानं तिची प्रकृती गंभीर होती. पोलिसांनी गौरवचा शोध घेण्यास सुरुवात केली. तो कुठेही सापडला नाही, पण आता गौरव यादव सापडल्याचं वृत्त आहे. दरम्यान एक बाब लक्षात घ्यावी लागेल, जेव्हा पोलीस आणि कुटुंबियांनी गौरवचा शोध सुरु केला, तेव्हा यमुना नदीजवळ त्याचे कपडे आढळून आले होते. गौरवने नदीत उडी मारत आपलंच जीवन संपवल्याचा संशय होता. हा संशय खरा ठरला असून, घटनेच्या काही दिवसांतच पोलिसांनी गौरव यादवचा मृतदेह यमुना नदीतून बाहेर काढल्याचं सांगण्यात येत आहे. या घटनेनंतर गौरवने त्याच्या कुटुंबाशी फोनवरून संवाद साधला होता. या कथित घटनेची ऑडिओ क्लिप आता व्हायरल होत आहे.



■**मुंबई । प्रतिनिधी,**

उत्तर प्रदेशातील बांदा येथील मार्का पोलीस ठाणे परिसरातील गौरव यादव नावाच्या एका कॉन्स्टेबलने आपल्याच चिमुकलीला संपवलं. नंतर तो घटनास्थळावरून पळून गेला. १४ जानेवारी रोजी मकरसंक्रांत सणादिवशी कुटुंबात मोठा अनर्थ घडल्याचं वृत्त समोर आलं. कौटुंबिक कलहातून गौरवने पत्नी शिवानीवर तव्याने हल्ला चढवला होता.

यादरम्यान, लहान मुलीची देखील हत्या करण्यात आली. यानंतर गौरव हा घटनास्थळावरून फरार झाला, नंतर पाण्यात उडी मारत त्यानं आपलं जीवन संपवलं. संबंधित प्रकरणात पोलिसांनी शोध घेतला असता, नदीत त्याचा मृतदेह आढळून आला होता.

**'मी खूप मोठी चूक केली..'**

संबंधित ऑडिओत गौरव म्हणतो की, 'मी खूप मोठी चूक केली, आज शिवानीशी माझा वाद झाला होता, ती मला सतत चिथावत असायची. तिने मला अनेकदा चिथावलं. माझा गणवेश देखील फाडून टाकला. त्यानंतर मी शिवानीच्या डोक्यावर जोरदार हल्ला केला'. हा ऑडिओ गौरवने नदीत उडी मारण्यापूर्वीचा असल्याचं सांगण्यात येत आहे.

**बापाने चिमुरडीला संपवलं**

शिवानी ही सध्या कानपुरात उपचार घेत आहे, जिथं तिची प्रकृती सध्या चिंताजनक असल्याचं सांगण्यात येत आहे. शिवानीच्या कुटुंबाने हुंडाबळी खटला दाखल केला. कुटुंबातील सात सदस्यांवर हुंडाबळीप्रकरणी गुन्हा दाखल केला असून पोलीस या प्रकरणाचा शोध घेत आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गौरव यादव या पोलीस अधिकाऱ्याने १४ जानेवारी रोजी कौटुंबिक वादातून पत्नी आणि मुलीवर प्राणघातक हल्ला केला होता. या हल्ल्यात चिमुकलीचा मृत्यू झाला. नंतर मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला, दरम्यान या प्रकरणाचा तपास सुरु आहे.



# संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## दिखाऊ हिंदुत्वाचा खरा चेहरा

**काशी हे हिंदू धर्माचे पवित्र केंद्र असून हजारो वर्षांपासून श्रद्धेवर उभे आहे, पण आज 'विकास' आणि 'कॉरिडॉर'च्या नावाखाली चालणाऱ्या बुलडोझर प्रकल्पांमुळे तिचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा धोक्यात आला आहे.**

काशी हे केवळ एक शहर नाही, तर तो हिंदू संस्कृतीचा श्वास, अध्यात्माचा गाभा आणि मोक्षाची संकल्पना आहे. 'काश्यां हि काशते काशी' असे सांगणारी ही नगरी हजारो वर्षांपासून अखंड श्रद्धेवर उभी आहे. इतिहासाच्या प्रदीर्घ प्रवासात आक्रमणे झाली, सत्ता बदलली, राजे गेले; पण काशीचा आत्मा टिकून राहिला, कारण तो कोणत्याही राज्यसत्तेच्या कृपेवर नव्हे, तर हिंदूंच्या श्रद्धेवर आधारलेला आहे. काशीचा हा आत्मा बाह्य आक्रमणामुळे नव्हे, तर 'विकास', 'सौंदर्यीकरण' आणि 'कॉरिडॉर'सारख्या आकर्षक शब्दांच्या आडून सरकारकडून सुरू असलेल्या प्रकल्पांमुळे संकटात सापडला आहे. हे प्रकल्प काशीच्या ऐतिहासिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक रचनेवर घाव घालत आहेत. श्रद्धा, परंपरा आणि स्मृती उद्ध्वस्त करणारा हा विकास कोणासाठी केला जातोय, असा प्रश्न काशीच्या गल्लीबोळांतून विचारला जातोय. केंद्रात आणि उत्तर प्रदेशात भाजपचे सरकार आल्यानंतर काशी विश्वनाथ कॉरिडॉरच्या पहिल्या टप्प्याचे काम सुरू झाले. त्यात शेकडो लहान-मोठी मंदिरे, पूजास्थळे, प्राचीन गल्ल्या प्रशासनाने 'अतिक्रमण' ठरवून तोडली. ती वाचवण्यासाठी साधू, संत, महंत यांच्यासह शंकराचार्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. पण त्यांच्या बुलडोझरखाली चिरडून प्रकल्प रेटला. तोडलेली मंदिरे अनधिकृत नव्हती; ती काशीच्या धार्मिक रचनेचा अविभाज्य भाग होती. पुराणांमध्ये त्यांचा उल्लेख आहे. शेकडो- हजारो लोकांची उपजीविका यावर अवलंबून होती. काशीची परंपरा ही एकाच भव्य मंदिराभोवती केंद्रित नाही, तर ती असंख्य छोट्या देवळांमध्ये, गल्लीबोळांत आणि घाटांमध्ये विखुरलेली आहे. हा आत्मा समजून न घेता केवळ सिमेंट-कॉंक्रीटचा भव्य देखावा उभा करणे म्हणजे काशीचे रूप बदलणे नव्हे, तर तिचे अस्तित्वच पुसून टाकणे होय. आता 'कॉरिडॉर-२'च्या नावाखाली पुन्हा एकदा तोच प्रकार सुरू आहे. मंदिरे, मूर्ती, घाट, ऐतिहासिक रचना पुन्हा एकदा बुलडोझरखाली जात आहेत. मणिकर्णिका घाट हा हिंदू धर्मातील मोक्ष-संकल्पनेचा केंद्रबिंदू आहे. या घाटावर ज्यांचे अंत्यसंस्कार होतात त्यांची जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्तता होते, असे हिंदू धर्मीय मानतात. त्यामुळे देश-विदेशात मृत्यू झालेल्या लाखो हिंदूंच्या इच्छापत्रात आपले अंत्यसंस्कार मणिकर्णिका घाटावर व्हावेत, असे लिहिलेले असते. हजारो वर्षांपासून येथे अखंड पेटलेली चिता, तारक मंत्राची परंपरा आणि अंत्यसंस्कारामध्ये डोम समाजाची भूमिका या साऱ्यांमुळे मणिकर्णिका घाट अद्वितीय ठरतो. याच मणिकर्णिका घाटावर जीर्णोद्धाराच्या नावाखाली बुलडोझर चालवून विध्वंस सुरू आहे. प्राचीन रचना मोडल्या, शिवलिंगे काढली, मंदिरे तोडली गेली. स्मशानभूमीला पर्यटनस्थळात रूपांतरित करण्याची ही संकल्पना हिंदू तत्त्वज्ञानाच्या विरोधी आहे. मोक्ष ही भावना आहे; ती फोटोसेशन किंवा व्ह्यू-पॉइंटसाठी नसते याचे भान सत्ताधाऱ्यांना राहिले नाही. भारतीय इतिहासात पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे स्थान अत्यंत मानाचे आहे. त्यांनी देशभरात हजारो मंदिरांचा जीर्णोद्धार केला. काशी विश्वनाथ मंदिर मणिकर्णिका घाटाचा जीर्णोद्धारही त्यांनीच केला होता. राजकारणात त्यांनी विध्वंसापेक्षा संरक्षण जीर्णोद्धार आणि पुनर्निर्माणाला महत्त्व दिले. याच अहिल्यादेवींनी जीर्णोद्धार केलेला मणिकर्णिका घाट आज मोदी-योगी सरकारच्या बुलडोझरखाली गेला. इतकेच नव्हे, तर अहिल्यादेवींच्या मूतीर्ही तोडल्या गेल्या. हजारो मूर्ती खंडित झाल्या, शेकडो मूर्तींना गंगेत जलसमाधी मिळाली. अहिल्यादेवींचे वंशज प्रिन्स यशवंत होळकर घाटावर जाऊन तुटलेल्या मूर्ती कापडाने झाकण्याचा प्रयत्न करत आहेत. समाजमाध्यमांत घाटाच्या विध्वंसाचे हजारो-लाखो व्हिडीओ आणि फोटो फिरत आहेत. पण हे सर्व कशासाठी केले जात आहे? तर जी माहिती मिळतेय त्यानुसार सरकारला मणिकर्णिका घाटावर बसस्थानक बांधायचे आहे. त्यासाठी हिंदू धर्माच्या आध्यात्मिक राजधानीचा विध्वंस सुरू आहे. भाजप सरकार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे ३०० वे जन्मशताब्दी वर्ष मोठा गाजावाजा करून साजरे करत आहे. या निमित्ताने त्यांच्या स्मरणार्थ नाणे जारी करण्यात आले आहे. इतकेच नव्हे, तर महाराष्ट्रातील भाजप सरकारने शासनाच्या अधिकृत लेटरहेडवरही अहिल्यादेवींचा फोटो छापला आहे. ज्या अहिल्यादेवी होळकरांचे नाव घेऊन भाजप राजकारण करते, त्याच अहिल्यादेवींच्या कार्यावर बुलडोझर चालवून भाजप सरकारने अहिल्यादेवींचा अवमान केला आहे. स्वतःला हिंदुत्ववादी म्हणवून घेणारे नरेंद्र मोदी आणि योगी आदित्यनाथ यांचे सरकार आज हिंदूंच्या अध्यात्मिक राजधानीचा आत्मा मोडीत काढत आहेत. एकीकडे मंदिर उद्घाटनांचे कार्यक्रम, धार्मिक भाषणं, प्रतीकात्मक पूजा आणि दुसरीकडे प्रत्यक्षात मंदिरे पाडणे, घाट तोडणे, श्रद्धास्थळांचे व्यावसायिकीकरण आणि व्यापारीकरण करणे हा विरोधाभास जनतेच्या लक्षात येऊ लागला आहे. हिंदू धर्म आणि हिंदुत्व ही भाजपसाठी फक्त राजकीय फायद्याची घोषणा आहे. पण हिंदुत्व म्हणजे परंपरेचे रक्षण, श्रद्धेचा सन्मान आणि सांस्कृतिक सातत्य जपणे होय. जर विकासाच्या नावाखाली हा धार्मिक वारसा नष्ट होत असेल, तर असा विकास हा हिंदुत्वविरोधीच ठरतो. काशीमधील विध्वंसावर देभरातून प्रचंड संताप व्यक्त केल्यानंतर काशीचे प्रशासन तोडलेल्या मूर्ती, अवशेष 'नंतर पुन्हा बसवले जातील' असे सांगत आहे. पण कटरने तोटलेल्या, बुलडोझरखाली चिरडलेल्या मूर्ती पुन्हा मूळ स्वरूपात उभ्या राहू शकत नाहीत हे सत्य आहे. त्यामुळे प्रशासनाचा दावा तांत्रिकदृष्ट्या आणि नैतिकदृष्ट्याही फसवा आहे. जागतिक वारसा शहरांकडे पाहिले तर लक्षात येते की, तेथे जुन्या रचनेचे जतन केले जाते. व्हेनिस, रोम, क्योटो, जगात कुठेही ऐतिहासिक वास्तू उद्ध्वस्त करून सौंदर्यीकरण केले जात नाही. मग काशीमध्येच असे का केले जात आहे? आज काशीमध्ये जे घडते आहे, ते केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक-आर्थिक संकटही आहे. डाल मंडीसारख्या पारंपरिक बाजारपेठा उद्ध्वस्त केल्या जात आहेत. हजारो कुटुंबांचे रोजगार धोक्यात आले आहेत. पुनर्वसनाच्या कोणत्याही योजना नाहीत. श्रद्धा, रोजगार आणि परंपरा या तिन्ही गोष्टी एकाच वेळी उद्ध्वस्त केल्या जात आहेत. हे सगळे पाहता प्रश्न उभा राहतो, काशी कोणासाठी बदलली जात आहे? काशीवासीयांसाठी की कॉर्पोरेट पर्यटनासाठी? का सरकारच्या मर्जीतील कंत्राटदारांच्या फायद्यासाठी? काशी नगरी प्रत्येक आघातानंतर उभी राहिली, इतिहास याचा साक्षी आहे. ती आजही उभी राहील. मात्र हा प्रश्न केवळ काशीपुरता मर्यादित नाही; तो भारताच्या सांस्कृतिक दिशेचा आहे. काशीचा आत्मा दगडात नाही; तो श्रद्धेत आहे. तो कोणत्याही बुलडोझरने पाडता येत नाही. एवढी किमान समज सत्ताधाऱ्यांना लाभावी, हीच अपेक्षा.

## भाजप नंबर वन तरीही ठाकरे बंधू सरस!



मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजप सर्वाधिक जागा मिळवणारा पक्ष ठरला आहे, तर भाजप-शिवसेना युतीला बहुमत मिळाले आहे. त्यामुळे महायुतीचा महापौर बसणार यात आता कुठलीही शंका उरलेली नाही.आता विरोधकांनी कितीही आटापिटा केला तरी निवडणुकीत जय किंवा पराजय एवढंच अंतिम सत्य असतं. मुंबईत भाजपने बाजी मारली, हे खुल्या मनाने स्वीकारायला हवे. त्याचवेळी मुंबईतील मतदानाचेही विश्लेषण होणे गरजेचे आहे. भाजप, एकनाथ शिंदे, ठाकरे बंधू, काँग्रेस यांनी काय कमावले आणि काय गमावले, याचाही विचार व्हायला हवा.

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका जाहीर झाल्या तेव्हा सर्व राजकीय पक्षांचे मुख्य लक्ष मुंबई महापालिकेच्या निवडणुकीवर लागले होते. कारण उर्वरित २८ महापालिकांचे एकत्रित बजेट आणि मुंबई महापालिकेचे एकट्याचे अंदाजे ७८ हजार कोटींचे बजेट लक्षात घेतले तर कुणाचा, कुठला आणि किती 'विकास' करता येईल, हे सहज लक्षात येईल. शिवाय मुंबई म्हणजे महाराष्ट्राची राजधानी, मराठी माणसांची अस्मिता, देशाची आर्थिक राजधानी, आंतरराष्ट्रीय घडामोडींचे शहर, परराज्यांची त्यातही उत्तरेकडील राज्याची नजर असलेले शहर आहे. त्यामुळे ज्याच्याकडे मुंबई महापालिकेची सत्ता त्याची राजकीय ताकद आपोआप वाढते. म्हणून २५ वर्षांपासून मुंबई महापालिकेवर वर्चस्व असलेल्या शिवसेनेला बाजूला करण्याचे भाजपचे अनेक वर्षांचे प्रयत्न होते. अगदी फार मागे जायची गरज नाही. मागील २०१७ ची निवडणूक भाजपने स्वबळावर लढवली होती. तेव्हा २२७ जागा लढवून भाजपने ८२ जागा मिळवल्या होत्या. तर शिवसेनेने ८४ जागांवर विजय मिळवला होता. थोडक्यासाठी मुंबई हातातून गेल्याचे शल्य तेव्हापासून भाजपला होते. म्हणूनच काहीही झाले तरी या निवडणुकीत मुंबई महापालिकेवर भाजपची सत्ता आलीच पाहिजे यासाठी त्यांचे नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याचा आटापिटा कायम होता. आता युती केल्यानंतरही भाजपला ८९ आणि शिवसेनेला २९ जागा मिळाल्या आहेत. इथे शिवसेना म्हणजे एकनाथ शिंदे हे लक्षात घ्यावे लागेल. कारण २०१७ शिवसेना अखंड होती. जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केल्यानंतर शिवसेनेत फूट पडली. शिवसेनेत फूट पाडल्याशिवाय मुंबई स्वबळावर जिंकता येणार नाही, हे भाजप नेतृत्वाने जाणले होते. भाजपचा तो डाव जून २०२२ मध्ये यशस्वी झाला. शिवसेना फुटली आणि उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असलेल्या महाविकास आघाडीचे सरकार २९ जून २०२२ रोजी कोसळले. तेव्हापासून ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यातून विस्तवही जात नाही. शिवाय ठाकरे आणि फडणवीस यांची मैत्री तुटली. या पार्श्वभूमीवर १५ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीचे महत्त्व लक्षात येते.

या निवडणुकीत भाजप-शिवसेना यांची युती होती. त्याविरोधात उद्धव ठाकरेंचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि राज ठाकरे यांचा मनसे या दोन पक्षांनी मोट बांधली होती. त्यांच्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षदेखील सहभागी झाला होता. तर काँग्रेसने स्वबळाचा नारा देत वंचित बहुजन आघाडीसोबत निवडणूक लढवली. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हिंदीसक्तीविरोधात मराठीच्या मुद्द्यावरून एकत्र आले आणि त्यांनी निवडणूकही एकत्र लढवली. त्यामुळे मराठी अस्मिता, मराठी भाषा, मुंबईतील मराठी माणूस आणि मुंबई महाराष्ट्राचीच हाच त्यांच्या प्रचाराचा गाभा होता. मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा कट अनेक वर्षांपासून आखला जात आहे आणि दरवेळी तो कसा उधळून लावला जातो, यावर ठाकरे बंधूंनी भर दिला. राज ठाकरे यांच्या शिवाजी पार्क मैदानावरील भाषणात मुंबईसह महाराष्ट्रातील अदानी साम्राज्यावरील प्रेझेंटेशन प्रचंड गाजले. किंबहुना शिवाजी पार्क मैदानावरील राज ठाकरे, उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरेंच्या भाषणांमुळे मुंबईतील राजकीय परिस्थिती एका रात्रीत बदलल्याची जोरदार चर्चा सुरू झाली होती. ऐनवेळी काही दगाफटका झाला नाही तर मुंबईवर ठाकरेंचीच सत्ता येणार, असेही ठामपणे सांगितले जात होते. त्यांची भाषणे प्रचंड व्हायरल झाली होती. दुसऱ्या दिवशी याच मैदानावर भाजप-शिवसेनेची सभा झाली. मात्र, या सभेला परराज्यातून माणसे आणल्याचा भाजपचा भांडाफोड झाला आणि रिकाम्या खुर्चांचेही दर्शन घडले. निकाल लागला तेव्हा भाजप आणि ठाकरे गट यांच्यात कांटे की टक्कर दिसत होती. अंतिम निकाल लागल्यानंतर भाजपला ८९ तर ठाकरे गटाला ६५ आणि मनसेला ६ अशा ७१ जागा मिळाल्याचे स्पष्ट झाले. यावरून आता मुंबईत कोण जिंकलं आणि कोण हरलं, याची चर्चा सुरू आहे.

२०१९ मध्ये शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचा महाविकास आघाडी सरकारचा अडीच वर्षांचा प्रयोग सुरू असतानाच याच सरकारमधील एकनाथ शिंदेंनी बंडखोरी करत शिवसेनेचे ४० आणि इतर १० अशा ५० आमदारांना सोबत घेत मुंबई ते गुवाहाटी व्हाया सूरत असा प्रवास केला होता. त्यानंतर ३० जून २०२२ रोजी शिंदे यांनी मुख्यमंत्रीपदाची आणि देवेंद्र फडणवीसांना उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेत शिवसेना-भाजप युतीचे सरकार स्थापन केले होते. पुढे अजित पवारांनी बंडखोरी करत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पाडली आणि ते त्यांच्या सहकार्यांसह सत्तेत सहभागी होत महायुतीचे सरकार अस्तित्वात आले. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही राजकीय पक्ष फुटले. त्यानंतर मुंबईतील शिवसेनेच्या ५० हून अधिक माजी नगरसेवकांनी एकनाथ शिंदे यांना साथ देत भावी नगरसेवकपदाची खुंटी मजबूत करण्याचा प्रयत्न केला. एकनाथ शिंदे यांनी मुंबईतील शिवसेना खिळखिळी केली. त्यानंतर शिवसेना पुन्हा स्वबळावर कशी उभी राहणार, हा प्रश्नच होता. मात्र, मराठीच्या मुद्द्यावरून आणि भाजपविरोधात ठाकरे बंधू एकत्र आले आणि जादूची कांडी फिरल्यासारखे चित्र बदलत गेले.

इथे आणखीही एक बाब लक्षात घेतली पाहिजे की, यंदा मुंबईतील मतदानाचा टक्का घसरला आहे. मुंबईत १ कोटी ३ लाख ४४ हजार ३१५ मतदार होते आणि केवळ ५२.९४ टक्के मतदान झाले. म्हणजेच ५४ लाख ७६ हजार ८९ मुंबईकरांनी मतदानाचा हक्क बजावला. २०१७ मध्ये ५५.२८ टक्के मतदान झाले होते. म्हणजेच मतदानात २.३४ टक्के घट झाली आहे. याचा थेट अर्थ असा होतो की ४७.०६ टक्के मतदारांनी (४८ लाख ६८ हजार २२६ मतदार) मतदानाकडे पाठ फिरवल्याचे दिसून आले. यातील अनेकांची नावे गायब झाली. दुबार मतदारांच्या गोंधळामुळे अनेकांना मतदान करता आले नाही. शिवाय २०१९ पासून बदललेली राजकीय परिस्थिती लक्षात घेतली तर मुंबईत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेची ताकद मोठ्या प्रमाणात वाढली आहे. भाजपने २०१७ पासूनच स्वबळाची तयारी केल्यामुळे त्यांनी मतदारांवर त्यातही उत्तरेकडील मतदारांवर लक्ष केंद्रित केले होते. ज्या अर्थी उत्तरेकडील आमदार, कलाकार भाजप प्रचाराला मुंबईत आणते याचा स्पष्ट अर्थ होतो. शिवाय केंद्रात आणि राज्यात दोन्ही ठिकाणी भाजपची सत्ता, मेट्रोचे जाळे विणून केलेल्या विकासाचा दावा, अटलसेतूची निर्मिती केल्याचे यश, मूळ शिवसेनेची संकल्पना असलेल्या कोस्टल रोडला भाजप-शिवसेना महायुती सरकारने दिलेला आकार ही भाजपच्या खूप जमेची बाजू होती. ठाकरेंच्या शिवसेनेत जुन्यांपैकी जेमतेम २०-२५ माजी नगरसेवक होते. ५० हून अधिक माजी नगरसेवक शिंदेंसोबत गेले होते. मनसेकडे तर नगरसेवक नव्हते.तरीही एकनाथ शिंदें यांचे २९ उमेदवार निवडून आले तर सत्ता आणि आर्थिक ताकद, नेत्यांची फौज, कार्यकर्त्यांचे जाळे, शिस्तबद्ध बूथ नेटवर्क असतानाही जर ठाकरे गट आणि मनसेचे तब्बल ७१ उमेदवार निवडणूक येत असतील तर याला ठाकरे बंधूंचे निर्विवाद यश का म्हणू नये? भले त्यांना बहुमत मिळालेले नाही तरीही ठाकरेंची भूमिका मुंबईकरांना पटल्याचे स्पष्ट दिसत आहे. मग ते मराठी असोत किंवा इतर राज्यांतून आलेले असोत. वास्तविक एकनाथ शिंदेंनी ठाकरेंचे मुंबईतील नगरसेवक त्यांच्या पक्षात घेतल्याने ठाकरेंची ताकद कमी व्हायला हवी होती. तसे न होता शिंदेंचे बळ कमी झाले आहे. मात्र, महायुतीत असल्यामुळे आणि शिंदेंमुळे भाजपच्या महापौरपदाची स्वप्नपूर्ती होत असल्याने शिंदेंच्या २९ नगरसेवकांना महत्त्व प्राप्त झाले आहे. भाजपच्या सत्तेसाठी त्यांची किंगमेकरची भूमिका ठरत आहे.

या निवडणुकीत पैसे वाटल्याचा आरोप सर्रास होत होता. तसे काही व्हिडीओ वृत्त वाहिन्यांवर दाखवण्यात आले आणि सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. तसेच भाऊ, बहीण आणि वहिनीच्या मदतीला धावलेले कुलाब्यातील भाजप आमदार आणि विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर त्यांच्या एका व्हायरल व्हिडीओमुळे वादाच्या भोवर्यात सापडले होते. या व्हिडीओमुळे राजकीय वातावरण तापले होते. अनेक ठिकाणी मतदारांना भांडी, कपडे वाटण्यात आले. पैशाचा बेहिशेबी वापर झाल्याची चर्चा अजिबात लपून राहिलेली नाही. अशीच चर्चा नगरपरिषदांच्या निवडणुकीतही झाली होती. शिवाय या गोंधळात राज्य निवडणूक आयोगाची भूमिका कायम संशयित राहिल्याचे वारंवार दिसून आले. 'पाडू' मशीन संदर्भात राज्य निवडणूक आयोगाची पारदर्शकता कुठेही दिसत नव्हती. मतदानाच्या दिवशी मुंबईसह राज्यातील अनेक मतदान केंद्रांवरील ईव्हीएम मशीन बंद पडल्या होत्या. अनेक केंद्रावर तास-दीड तास मशीन बंद होत्या. काही ठिकाणी बटन दाबले जात नव्हते, अशाही तक्राही होत्या. या तक्रारींवर राज्य निवडणूक आयुक्त कारवाई करणार का, हा खरा प्रश्न आहे. मात्र, या निवडणुकीच्या गदारोळात दोन्ही ठाकरे बंधूंची ताकद दिसून आली, शिवाय मराठीसह इतर भाषक मतदारांनीही ठाकरेंना पसंती दिल्याचे लक्षात येते. मात्र, लोकशाहीत बहुमताला महत्त्व असल्याने झालेल्या मतदानातील सर्वाधिक ४५.२२ टक्के मते भाजपला मिळाली आहेत आणि भाजप हा मुंबईतील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे, हे नाकारता येणार नाही.

## जागरूक नागरिकांची निगराणी आवश्यक!

नुकत्याच संपन्न झालेल्या २९ महानगरपालिका निवडणुका दर्शवितात की, जागरूक नागरिकांची सततची निगराणी राजकारणातील सत्ता आणि भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी अत्यावश्यक आहे.



महानगरपालिकांच्या निवडणुका नुकत्याच संपन्न झाल्या. मागील वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्या आधी दोन वेळा सत्ता राखलेल्या भारतीय जनता पक्षाला झटका बसला. सत्तेला चिकटून राहण्यासाठी दोन पक्षांच्या कुबड्या घेतल्या तेव्हा कुठे राष्ट्रीय लोकशाही आघाडीला विजय साजरा करता आला. भाजप स्वतःला पार्टी विथ डिफरन्स म्हणतो. या पक्षाचे नेते वर्षाचे १२ महिने, ३६५ दिवस व २४ तास इलेक्शन मोडमध्ये असतात. यांची मातृ संघटना राष्ट्रीय स्वयंसेवक संघ राजकीय-सामाजिक-आर्थिक पातळीवर सतत स्वतःच्या हिताचे फासे पडताहेत ना याकडे डोळ्यांत तेल घालून लक्ष ठेवत असते. सत्ताधाऱ्यांनी विरोधकांना संसदेतून घाऊकरीत्या निष्कासित करून निवडणूक यंत्रणा पूर्णपणे आपल्या अधीन राहील अशाप्रकारचे कायदे करून टाकले. स्वायत्त निवडणूक यंत्रणा एकदा उद्ध्वस्त करून टाकली की, सत्ता टिकवण्याचे पुढचे काम एकदम सहज सोप्पे होऊन जाते आणि मग मनासारखे निकाल लावण्यासाठी सर्व प्रकारचे विधीनिषेध गुंडाळून ठेवले जातात! वर या सर्व राजकारणाला चांगले, आवश्यक, योग्य अशी विशेषणं लावणारे होयबा, संघाच्या माध्यमातून समाजात सर्वत्र पेरण्याचे काम सतत सुरूच असल्याने, प्रस्थापित माध्यमांमधूनही 'सर्व आकाश भाजपचे' असे मथळे मॅनेज केले जातात! हा सर्व विजयोत्सव अगदी स्वाभाविक वाटेल, असे वातावरण निर्माण केले जाते. भले भले तथाकथित जागरूक नागरिकही यात वाहून जायला लागतात. अशावेळी विवेकाचे स्वर जागृत ठेवून, महानगरपालिका निवडणुकांचे अर्थ समजून घ्यायला हवे.

सत्ताधारी अनेक प्रकारे सत्तेचा गैरवापर करतात. पहिली बाब म्हणजे, पूर्वीप्रमाणे सत्ताधाऱ्यांना आता अँटी इनकंबन्सी फॅक्टरचे भय उरलेले नाही. कारण हातातील सत्ता वापरून अधिकृतपणे मतदारांना भुरळ पाडणाऱ्या योजनांवर चंदा उधळण्याचा धंदा आता तेजीत आहे. केंद्रातील आणि राज्यातील सत्तेतून होणाऱ्या आर्थिक लाभाच्या सहाय्याने पैशाच्या बळावर लोकांची मते खरीदता येऊ शकतात, हेही या निवडणुकीतून सिद्ध झाले. दुसरं, जिथे कुठे विरोधक बळकट स्थितीत असतील तिथे ईडी-सीबीआय, कोट्यवधीची लालूच नाही तर धाकदपटशा वापरून, विरोधकांच्या शिलेदारांना बळजबरीने वा नाइलाजास्तव आपल्या बाजूला वळवणे. तिसरे, सत्ता हातात असल्याने व निवडणूक यंत्रणेला आपल्या हातातील बाहुले बनवली असल्याने निवडणूक अर्ज भरणे, अर्जांची छाननी करणे, अर्ज मागे घेणे आदी प्रत्येक स्तरावर आपल्याला डोईजड होऊ शकणारे तगडे प्रतिस्पर्धी रिंगणात शिल्लकच राहणार नाहीत अशी तजवीज करणे. वर या साऱ्या प्रकाराला 'बिनविरोध निवड' असे गोंडस नाव दिले जाते! बिनविरोध निवड फक्त सत्ताधारी पक्षातल्याच व त्यातही नेत्यांच्या सग्या- सोयऱ्यांचीच कशी होते, हे आपण आत्ताच्या निवडणुकीत फार उघडपणे झाल्याचे पाहिले. निवडणूक याद्या बनवताना होणारा घोळ, ऐनवेळी मतदारांना आपले मतदान केंद्र न सापडणं, मतदान केल्याची खूण म्हणून बोटावर लावली जाणारी शाई तकलादू ठेवणं आदी प्रकारही सर्रास आढळून आले. अशा प्रकारे दिवसाढवळ्या छापेमारी करण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी वापरलेल्या इतर अनेक क्लृप्त्या सांगता येतील.

इतकी सारी आयुधं दिमतीला असतानाही भाजपला २९ पैकी फक्त ९ महापालिकांमध्ये विजय मिळवता आला आहे. अनेक ठिकाणी सपशेल हार झाली आहे. सत्तेसाठी अनेक ठिकाणी इतरांच्या कुबड्या लागणार आहेत. वर आपले भागीदार पक्ष सत्तेजवळ न पोहोचता उलट त्यांना क्रमाक्रमाने शून्यावर नेऊन ठेवण्याचे कसबही ठरल्यानुसार पार पाडले गेले आहे! पुणे महानगरपालिकेत राष्ट्रवादीच्या अजित पवार आणि शरद पवार या दोन्ही गटांना पराभूत करून भाजपने तिथे आपला झेंडा रोवला. लातूरमध्ये काँग्रेसच्या दिवंगत लोकप्रिय नेत्याबाबत, 'मिट्टी में मिला देंगे', अशी उद्दाम भाषा वापरणाऱ्या भाजपला मतदारांनी आस्मान दाखवलं आणि पुन्हा काँग्रेसला विजयी केलं. कोल्हापूरमध्ये काँग्रेसच्या विजयाने दाखवून दिलं की, तिथल्या धर्मनिरपेक्षतेच्या वातावरणाला नख लावणे मतदारांना मान्य नाही! महायुतीसाठी सर्वात महत्त्वाच्या अशा मुंबई महापालिकेत मात्र बहुमताचा आकडा कोणालाच गाठता आला नाही. या आधीच्या २०१७ साली झालेल्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपला ८२ जागा मिळाल्या होत्या. त्यानंतर केंद्रात आणि राज्यात भाजपची सत्ता असताना देखील भाजपला ८९ जागाच मिळवता आल्या आहेत. या उलट तेव्हा एकसंघ असलेल्या शिवसेनेला ८४ जागा मिळाल्या होत्या आणि आता उद्धव सेनेच्या ६५ आणि शिंदे सेनेच्या २९ मिळून ९४ जागा मिळाल्या आहेत. हे मराठी मतदार अजूनही शिवसेनेच्या पाठी आहेत याचं द्योतक असू शकतं. मनसेच्या जागाही २०१७ साली ७ होत्या आणि आता ६ मिळाल्या आहेत. शिवसेनेचे ५४ नगरसेवक फोडूनही, उरलेले नगरसेवक कुंपणावर बसलेले असतानाही आणि अनेक मोठ्या नेत्यांना भाजपने गळास लावूनही ठाकरे सेनेचे ६५ नगरसेवक निवडून आले. ही गोष्ट भाजपसाठी धडा आहे की, मराठी माणसांना डावलून हिंदुत्वाच्या नावाने मुंबईत राजकारण होत नाही. मुंबई महापालिकेत भाजपने ८९ जागा मिळवल्या असल्या तरीही बहुमतासाठी लागणाऱ्या ११४ जागांसाठी त्यांना शिंदेंच्या २९ जागांचा आसरा घ्यावाच लागणार आहे. भाजप एकटा स्वतःच्या जीवावर सत्तेत येऊ शकत नाही. त्यामुळे महापौर कोण हे ठरवण्यात एकनाथ शिंदेंचे मत कळीचे! ठाकरे सेनेने सत्ता गमावली असली तरीही त्यांचा पाठीराखा असलेला मराठी मतदार आताही त्यांच्या मागे उभा राहिला आणि मराठी माणसांचा बालेकिल्ला असलेल्या मतदारसंघात ठाकरे बंधूंना महत्त्वाचे यश मिळाले आहे.

सुमारे ७५ हजार करोड रुपयांचे अंदाजपत्रक असलेली मुंबई महापालिका ही देशातली सर्वात श्रीमंत महापालिका आहे. त्यामुळे मुंबईवर ताबा मिळवण्याचा सत्तेचा खेळ सरळ असणार नाही, हे महायुतीतील दोन्ही तथाकथित मित्रपक्षांनी सांगून टाकलं आहे. प्रचाराच्या काळात आम्ही सत्तेसाठी नाही तर तत्त्वांसाठी युती केल्याच्या बाता करणाया शिंदेसेनेने आपल्या नगरसेवकांना पंचतारांकित हॉटेलात डांबून ठेवलंय. मोबाईल वा फोनवरून बाहेर संपर्क साधण्यासाठी त्यांच्यावर बंदी करण्यात आली आहे. शिंदेसेनेचा जसा आपल्या नवनिर्वाचित नगरसेवकांवर विश्वास नाही, तसा भाजपवरही नाही! आपले पार्टनर भाजप सत्तेसाठी काणत्या थराला जाऊ शकतात हे अलीकडेच त्यांनी अंबरनाथ नगरपरिषदेपासून अकोटपर्यंत अनुभवले असल्यामुळे, ही बंदी अधिक कडक करण्यात आली आहे. आपली मुलं-सुना-बायको-भाऊ वा स्वतःला उमेदवारी दिली नाही म्हणून पक्ष सोडणाऱ्यांच्या या पक्षांमध्ये, वैचारिक स्पष्टता वा विचाराधारित राजकारणाचा मागमूसही नाही.

लोकप्रतिनिधींची सत्ता जाऊन २०२१-२२ साली प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या हातात सत्ता जाताच ९० हजार करोड रुपयांहून अधिकच्या ठेवींमधल्या १२ हजार करोड रुपयांहून अधिकच्या ठेवी २०२५ पर्यंत वापरल्या गेल्या आहेत. या काळात सत्तेवर असलेल्या भाजपने मुंबईकरांची केलेली ही लूट आहे. त्यामुळे मुंबईतल्या जागरूक मतदारांनी भाजपला महापौरपदाचा कौल दिलेला नाही. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना-मनसे आघाडी व काँग्रेस आदी भाजपविरोधी पक्षांना तुल्यबळ ताकद देत, मतदारांनी सूज्ञ निवाडा केला आहे. युती व विरोधक आघाडी यात अवघ्या ४ जागांचं अंतर आहे. ठाणे, उल्हासनगर आदी महापालिकांमध्ये एकही उमेदवार पसंत नाही या 'नोटा'वर मोठ्या प्रमाणात मतदान झालं आहे. भाजपच्या मराठीद्वेष्ट्या व कॉर्पोरेटधार्जिण्या राजकारणावर राग व्यक्त करणाऱ्या नागरिकांनी, आता राजकारणावर देखरेख ठेवण्यात पुढाकार घेणे आवश्यक आहे. सर्वच नगरपालिकांमध्ये जागरूक नागरिकांची निगराणीच लोकशाही बळकट ठेवू शकेल.

## इराणमधील असंतोष!



इराणचे चलन 'रियाल' इतिहासातील नीचांकी स्तरावर असून महागाई ६० ते ७० टक्क्यांच्या पुढे गेली आहे. इराणचा आर्थिक डोलारा कोसळला आहे आणि महागाई पुष्कळ वाढली आहे. इराणच्या 'रियाल'ची घसरण झाल्यामुळे तेहरान येथील इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचा व्यवसाय करणाया व्यापायांनी त्यांची दुकाने बंद करून संप पुकारला आणि लोकांनाही संपात सहभागी होण्याचे आवाहन केले. इराणी जनता लागलीच या आवाहनाला प्रतिसाद देत त्वरित संपामध्ये सहभागी झाली. सध्या या आंदोलनाचे लोण इराणची अनेक शहरे आणि गावे यांमध्ये पसरले आहे. ज्या भागांमध्ये कधी आंदोलने झाली नाहीत, त्या भागांमध्येही आंदोलनाचे लोण पोचणे आणि तेही एवढ्या जलदगतीने हे आश्चर्यकारक असून 'हे बाह्य पाठिंब्याविना घडणार नाही', अशी इराणला शंका आहे. सरकारने इंटरनेटवर निर्बंध घातले असूनही लोक रस्त्यावर उतरत असल्यामुळे सरकारने क्रूरतेने हे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला आहे. मानवाधिकार संघटनांच्या अहवालानुसार १७ जानेवारी २०२६ पर्यंत अनुमाने ३ सहस्र ९० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. यात साधारण २ सहस्र ८८५ आंदोलक आणि १३५ सुरक्षा दलाच्या सैनिकांचा समावेश आहे. काही आंतरराष्ट्रीय वृत्तसंस्थांच्या मते हा आकडा ५ ते १२ सहस्र या संख्येत असू शकतो. आंदोलन चालू झाल्यापासून आतापर्यंत २४ सहस्रांहून अधिक लोकांना अटक करण्यात आली आहे. आंदोलनात झालेल्या मृत्यूच्या संख्येवरून आंदोलनाची व्याप्ती लक्षात येते. इराण आणि आंदोलने हे काही नवीन समीकरण नाही. इराणमध्ये अनेक वेळा आंदोलने झाली आहेत. वर्ष १९७९ मध्ये इराणमधील राजेशाही संपुष्टात आणण्यासाठी झालेली इस्लामी क्रांती, त्यानंतर वर्ष २०१७, २०१८, २०२२ आणि २०२३ अशी मोठी आंदोलने झाली आहेत. वर्ष १९७९ मध्ये इराणमध्ये पहलवी यांची राजेशाही इराणमधील कट्टरतावाद्यांनी हिंसक आंदोलन करून, अमेरिकेच्या नागरिकांना ओलीस ठेवून संपुष्टात आणली होती. त्यानंतर खोमेनी यांचे हुकूमशाहीचे एक हाती सत्ताकेंद्र जन्माला आले. मूळ उठाव करणारे खोमेनी आज हयात नसले, तरी त्यानंतर त्यांची गादी चालवणारे अली खामेनी यांनी त्यांची परंपरा पुढे नेली आहे. इराण खरे तर पूवीर्चा पर्शिया म्हणजे पारशांचा देश; मात्र येथे इस्लामी कट्टरतावाद्यांनी हळूहळू बस्तान बांधत पारशांना संपुष्टात आणले आणि जे काही उरलेसुरले होते, ते भारतात पळून आले. याचा उल्लेख करण्याचे कारण म्हणजे सध्या आंदोलनकर्त्यांमधील काही जणांनी इराणची मूळ पारशी संस्कृती पुनर्स्थापित करण्याची केलेली मागणी ! म्हणजे त्यांना सध्याची शिया इस्लामी राजवटही नको आहे. ही मागणी म्हणजे स्तुत्य प्रयत्न असला, तरी सध्याच्या भयानक इस्लामी राजवटीत ही कशी साध्य होणार? हा प्रश्न आहे.

## उच्च रक्तदाब नियंत्रणासाठी सोप्या टीप्स



**संशोधनात** असे आढळून आले आहे की, दहामधून सात तरुणांना ब्लडप्रेशर जास्त असल्यामुळे हार्ट अ‍ॅटॅक किंवा स्ट्रोक येण्याची शक्यता जास्त असते. झोप कमी होणे, स्ट्रेस, डिप्रेशन, जास्त मीठ असलेले फास्ट फूड आणि डेस्क जॉब ही याची मुख्य कारणे आहेत. म्हणून...

▮आठवड्यातून ३-४ दिवस कमीत कमी २० मिनिटे जॉगिंग करावी. जॉगिंग केल्याने ऑक्सिजन घेण्याच्या प्रक्रियेत सुधारणा होते आणि ब्लडप्रेशर नियंत्रित राहतो.

▮रोज कमीत कमी ३० मिनिटांचे ब्रिस्क वॉक करावे.

▮एरोबिक केल्याने हाय ब्लडप्रेशर कमी होते.

▮तणावरहित राहण्यासाठी प्राणायाम, कपालभाती करावे.

## चमकदार त्वचेसाठी हे स्क्रब वापरून बघा

आपल्या चेहऱ्यावरील चमक हळूहळू कमी होत आहे, तर काळजी करू नका. आम्ही आपल्याला काही घरगुती स्क्रबबद्दल सांगत आहोत ज्यांना वापरून आपण आपल्या चेहऱ्यावरील चमक परत मिळवू शकता. चला तर मग वेळ न गमावता जाणून घेऊया की, आपण घरगुती स्क्रब कसा तयार करू शकता...

**साखर आणि लिंबू –**

एक चमचा साखर घेऊन त्यामध्ये अर्धा चमचा लिंबाचा रस मिसळा. आता हळुवार हाताने याला आपल्या चेहऱ्यावर लावा आणि काही वेळ स्क्रब करून आपला चेहरा स्वच्छ धुवा.

**संत्र्याच्या सालीचे स्क्रब –**

संत्र्याची साल आपल्या त्वचेला तजेलपणा आणण्यासाठी उपयुक्त आहे. यासाठी आपल्याला संत्र्याच्या सालीला वाळवून वाटून भुकटी करायची आहे. या भुकटीमध्ये थोडेसे कच्चे दूध मिसळून आपण चेहऱ्यावर लावू शकता. संत्र्याच्या सालाची भुकटी किंवा पावडर चांगले स्क्रब म्हणून काम करतं.

**तांदळाच्या पिठाचे स्क्रब –**

तांदळाचे पीठ आणि दही सम प्रमाणात मिसळून घ्या. आता हे चेहऱ्यावर लावून हळुवार हाताने मालिश करा आणि काही वेळ तसेच ठेवून नंतर स्वच्छ पाण्याने धुऊन घ्या.

**बेकिंग सोडा स्क्रब –**

घरच्या घरी आपला चेहरा उजळवायचा असल्यास २ मोठे चमचे बेकिंग सोडा, १ लहान चमचा दालचिनी पूड, अर्धा लिंबाचा रस आणि मध मिसळा. या पेस्टला आपल्या त्वचेवर ५ मिनिटे लावा. लक्षात ठेवा की या पेस्टचा वापर आठवड्यातून दोन वेळापेक्षा जास्त करू नये.



## पेरूची पानेदेखील उपयुक्त असतात, नक्की वाचा याचे फायदे



पेरू औषधी गुणधर्मांने समृद्ध आहे. याच्या सेवनाने बरेच आरोग्यदायी फायदे मिळतात. उलट्या रोखण्यासाठी पेरू फायदेशीर आहे तसेच हृदयरोगापासूनदेखील बचाव होतो. तसे तर हे भारतात मिळणारे एक साधे फळ आहे, ज्याचे प्राचीन संस्कृत नाव अमृत किंवा अमृत फळ आहे. वाराणसीमध्ये याला लोक अमृत नावानेच संबोधित करतात. पेरूप्रमाणेच त्याची पानेदेखील खूप उपयुक्त असतात. यामध्ये अँटी ऑक्सिडन्ट, अँटी बॅक्टेरियल आणि अँटी इन्फ्लमेन्टरी गुणधर्म असतात, जे आपले अनेक आजारांपासून संरक्षण करतात. चला जाणून घेऊया पेरूच्या पानाचे फायदे.

पोटदुखी आणि उलट्यामध्ये आराम देतो : पेरूच्या पानात अँटी बॅक्टेरियल गुणधर्म असतात, याच्या पानाच्या पाण्याचे सेवन केल्याने आपल्या पोटाचे दुखणे दूर होऊ शकते. तसेच उलट्यापासून देखील आराम मिळतो. यासाठी पेरूच्या ५-६ पानांना १० मिनिटे उकळवून घ्या आणि नंतर गाळून त्याचे पाणी प्या.

सांधेदुखीचा त्रास दूर होतो : सांधेदुखीमध्येदेखील पेरूची पाने फायदेशीर आहेत. यासाठी आपण पेरूची पाने वाटून त्याचा लेप बनवा आणि त्या लेपाला सांध्यावर लावा, यामुळे आपल्याला वेदनेपासून आराम मिळेल.

मधुमेहातदेखील फायदेशीर : पेरूची पाने पाण्यात टाकून प्यायल्याने हे मधुमेहासाठी फायदेशीर मानले जाते. वास्तविक हे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करतं. याशिवाय हे शरीरातील जटिल स्टार्च साखरेमध्ये बदलण्यापासून रोखते, ज्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

दातदुखी, हिरड्यांची सूज कमी करते : पेरूच्या पानाचे पाणी दात दुखणे, हिरड्यांची सूज आणि तोंड येण्यापासून आराम देण्याचे काम करते. यासाठी पाने उकळवून त्या पाण्याने गुळण्या करा. असे केल्यास आपल्याला आराम मिळेल.

**बद्धकोष्ठता आणि गॅसच्या त्रासापासून मुक्ती मिळवण्यासाठी लसूण एक चमत्कारी औषध ठरेल. आयुर्वेदात लसूण हे चमत्कारिक गुणधर्म असलेले औषध म्हणून वर्णिले आहे, याचे बरेच फायदे आहेत. हे फक्त जेवण्याची चवच वाढवत नाही, तर शरीरास निरोगी ठेवण्यासदेखील मदत करते. याच कारणामुळे बऱ्याच घरगुती उपचारांमध्ये लसणाचा वापर केला जातो.**

## उपाशीपोटी लसूण खाण्याचे फायदे



**वास्तविक** लसणामध्ये अनेक प्रकारच्या पोषक घटकांचा समावेश आहे. यामध्ये कॅल्शियम ते तांबे, पोटॅशियम, फॉस्फरस, आयर्न आणि व्हिटॅमिन ई १ इत्यादींचा समावेश आहे. आपण लसणाचा वापर कोणत्याही प्रकारे करू शकतो. ते फायदेशीर आहेच; पण उपाशीपोटी खाल्ल्याने हे खूप फायदेशीर आहे. चला उपाशीपोटी याच्या सेवनाचे फायदे जाणून घेऊया.

**रोगप्रतिकारशक्ती मजबूत करतं –**

लसणाला प्रतिकारकशक्ती बळकट करण्यासाठी प्रभावी मानले आहे. अभ्यासात आढळून आले आहे की जे लोक दररोज लसणाचे सेवन करतात, त्यांना इतर लोकांपेक्षा सर्दी-पडसे कमी होते. सकाळी उपाशीपोटी त्याचे सेवन करणं जास्त फायदेशीर आहे.

**उच्च रक्तदाब असल्यास फायदेशीर –**

ज्या लोकांना उच्च रक्तदाबाची समस्या आहे, त्यांनी दररोज उपाशीपोटी लसणाचे सेवन करावे, कारण यामध्ये रक्तदाब नियंत्रित करण्याचे गुणधर्म आढळतात. लसूण चावून खाल्ल्याने उच्च रक्तदाबात आराम मिळतो.

**हृदयाचा धोका कमी होतो –**

लसूण हृदयरोगाच्या धोक्याला कमी करतं. जर हृदयाच्या रोगापासून वाचायचे असल्यास दररोज सकाळी लसणाचे सेवन करावे. मधासहदेखील लसणाचा सेवन करू शकतो. यामुळे रक्ताभिसरण योग्य राहते.

**पोटाशी निगडित त्रासापासून सुटका –**

दररोज उपाशीपोटी लसणाचे सेवन केल्यास पोटाशी निगडित त्रास जसे की बद्धकोष्ठता आणि गॅसपासून आराम मिळू शकतो. यामुळे पाचक प्रणालीदेखील चांगली राहील. जे लोक ॲसिडिटीच्या त्रासामुळे त्रस्त झाले आहेत, त्यांना भाजके लसूण खाण्याचा सल्ला दिला जातो.

## वजन कमी करण्यासाठी दिवसाला किती पोळ्या खाव्यात?

आपल्या दररोजच्या कॅलरीच्या प्रमाणाला लक्षात घेता पोळी किंवा भाकरीचे सेवन करावे. यामुळे आपल्या वाढत्या वजनाला कमी करण्यास मदत मिळेल. वजन कमी करण्यासाठी लोक आपल्या आहाराची काळजी घेतात. वास्तविक शरीरातील अतिरिक्त चरबी कमी करण्यासाठी कार्बोहायड्रेट घेणे टाळावे लागते. कार्बोहायड्रेटमुळे वजन झपाट्याने वाढते. पण कार्बोहायड्रेट हे आवश्यक मायक्रोन्यूट्रिएंट आहे, ज्याला वगळून चालणार नाही.



भारतातील आहाराबद्दल बोलायचे झाल्यास पोळी आणि भात हे कार्बोहायड्रेटचे चांगले स्त्रोत आहेत. जवळजवळ प्रत्येक घरात भात आणि पोळ्या नियमितपणे लोक खातात. परंतु जेव्हा वेळ येते वजन कमी करण्याची, तेव्हा लोकांना हे जाणून घ्यायचे असते की, दररोज किती पोळ्या खाव्या, जेणेकरून वजन वाढणार नाही. चला तर मग जाणून घ्या -

**गव्हामध्ये पौष्टिक घटक आढळतात :**

पोळ्यांमध्ये फक्त कार्बोहायड्रेटचं नव्हे तर इतर आवश्यक पोषक घटक देखील आढळतात. गहू हा प्रथिने, फॅट, फॉस्फरस, मॅग्नेशियम, फॉलेट आणि लोहाचा सर्वात चांगला स्त्रोत आहे. पोळी किंवा चपाती खाल्ल्याने शरीरास सर्व पोषक घटक मिळतात.

**दिवसात किती पोळ्या किंवा भाकऱ्या खाव्या?**

कार्बोहायड्रेट, प्रथिनं आणि फॅट किंवा चरबीला मायक्रोन्यूट्रिएंट म्हणतात. शरीरातील विविध कार्ये करण्यासाठी आपल्या शरीरास यांची गरज पडते. सर्वप्रथम आपल्याला हे ठरवावे लागणार की आपल्याला दररोज किती प्रमाणात कार्बोहायड्रेट घ्यायचे आहे. त्यानुसारच आपण दिवसाचा पोळीचा किंवा भाकरीचा आहार ठरवावा. ६ इंचाच्या लहान पोळीमध्ये ७१ कॅलरी आढळते. आपण दुपारच्या जेवणात ३०० कॅलरी घेतो, तर आपण दोन पोळ्या खाऊ शकतो. यापासून आपल्याला १४० कॅलरीज मिळतात आणि बाकीच्या कॅलरी आपल्याला सॅलड आणि भाज्यांपासून मिळते. लक्षात ठेवा की पोळीशिवाय आपण ज्या भाज्या आणि फळ घेत आहात त्यांच्यामध्ये देखील कार्बोहायड्रेट आढळते. म्हणून आपल्या कॅलरीच्या सेवन करण्यावरच हे अवलंबून आहे की आपल्याला दिवसात किती पोळ्या खायला हव्या. दिवसातून चार पोळ्या खाणे वजन कमी करण्यासाठी चांगले मानले जाते.

**पोळीचे इतर पर्याय :**

जर आपण वजन कमी करण्यासाठी प्रयत्नरत आहात, तर आपण गव्हाच्या पोळीव्यतिरिक्त ज्वारीची किंवा बाजरीची भाकरी देखील खाऊ शकता. या भाकऱ्या गव्हाच्या पोळीपेक्षा आरोग्यवर्धक असतात आणि यामध्ये कार्बोहायड्रेट कमी तर इतर पोषक घटक मुबलक प्रमाणात असतात.

**हे लक्षात घ्या :**

आहारात फक्त कार्बोहायड्रेटचे प्रमाण कमी केल्याने वजन कमी होत नाही. यासाठी आपल्याला इतर गोष्टी जशा की आपली जीवनशैली, झोपण्याची पद्धत आणि नियमितपणे व्यायामाची दिनचर्या या गोष्टी देखील आवश्यक आहेत. निरोगी आणि संतुलित आहारासह या गोष्टीकडे लक्ष द्यायला हवं.

## किचन स्वच्छ ठेवण्यासाठी काही टीप्स

**दररोज नोकरी किंवा व्यवसायामुळे आपल्याला आपल्या कामामधून वेळ मिळत नाही. अशा वेळी आपल्याला दररोज किचन साफ करणे जमत नाही. त्यामुळे ज्या गृहिणी कामामध्ये व्यस्त असतात, अशा गृहिणींसाठी काही खास टीप्स...**



▮**डायनिंग टेबल :** डायनिंग टेबल हे दररोजच्या जेवणामुळे घाण झालेले असते. त्यामुळे डायनिंग टेबलला स्वच्छ करण्यासाठी नीलगिरीच्या तेलाचा वापर करू शकता. टेबलमधून दुर्गंधी येत असल्यास एखाद्या कापडावर नीलगिरी तेलाचे काही थेंब टाकून त्याने पुसून घ्या. ▮**फ्रीज:** फ्रीजचे दार उकडलेल्या बटाट्याच्या सालींनी स्वच्छ केले जाऊ शकते. ▮ **नळ :** किचनमधील नळ चकचकीत करण्यासाठी त्यावर थोडीशी टूथपेस्ट लावा आणि गरम पाण्याने धुऊन टाका. ▮**कचऱ्याचा डबा :** किचनमध्ये जिथे कचऱ्याचा डबा ठेवतो, ती जागा नियमितपणे फिनेल टाकून स्वच्छ करावी. कारण सर्वात जास्त घाण त्या जागेवर जमते. त्यामुळे बॅक्टेरिया पसरतात. किचनमध्ये नेहमी झाकण असलेले कचऱ्याचे डबे वापरा. ▮ **मिक्सर :** मिक्सर वापरताना तो वापरून झाल्यावर त्यावरील घाण साफ करून त्याला कव्हर घालून ठेवा. त्यामुळे त्यावर धूळ जमा होत नाही. ▮ **स्टोव्ह :** स्टोव्ह स्वच्छ करण्यासाठी संत्र्याचे साल वापरा. त्याने स्टोव्हला रॉकेलचा जास्त वास येत नाही.

## भरलेली सिमला मिरची

**साहित्य** – २ वाट्या मक्याचे दाणे, १/२ चमचा जिरे पूड, पाव चमचा ओवा, १ चमचा लसूण-हिरवी मिरची पेस्ट, २ लहान चमचे दही, फोडणीसाठी तेल, जिरे, मोहरी, तिखट, मीठ, हळद, हिंग, ५-६ लहान आकाराची सिमला मिरची.

**कृती :** सर्वप्रथम मिरची भरलेल्या वांग्याप्रमाणे मधोमध कापून घ्या. बिया काढून घ्या. एका भांड्यात मक्याचे दाणे व मसाल्याचे सर्व साहित्य एकत्र करून तेलाचे मोहन घाला. मिरचीच्या बिया त्यातच घाला. थोडे दही घालून मिश्रण ओलसर करून घ्या. कढईत तेल, जिरे व मोहरी व हिंग घालून फोडणी करा व तेलावर मिरच्या पसरवा. मंद आचेवर मिरच्या लालसर होऊ द्या. बाजू उलटून घ्या. सर्व बाजूंनी मिरची लाल झाल्यावर गॅस बंद करा. झटपट भरलेली सिमला मिरची तयार होईल.



## वयाच्या पन्नाशीतही दिसा यंग आणि फिट

**वयाला हरवणाऱ्या काही सोप्या उपायांमुळे आपण ५० वर्षांनंतरही फिट, यंग आणि निरोगी राहू शकता. वय वाढत असल्यामुळे काही त्रास उद्भवणे साहजिक आहे. काही पर्याय निवडून आपण आपला त्रास कमी करू शकता. जसे शॉपिंगसाठी इकडे-तिकडे भटकण्यापेक्षा ऑनलाइन शॉपिंग करा. या वयात सुंदर दिसण्याची आवडही कमी होत जाते, म्हणून अनेक महिला अजागळासारख्या राहतात. परंतु, हा लेख केवळ त्या महिलांसाठी आहे ज्या पन्नाशीतही तिशीत असल्यासारख्या दिसू इच्छितात. हे काही सोपे उपाय अमलात आणून आपण या वयातही फिट आणि यंग दिसू शकता.**



▮**खाद्यपदार्थांनी पोषण मिळवा, सप्लिमेंट्सने नव्हे :** ऑर्गेनिक फूड सेवन करा आणि प्रोसेस्ड फूड जसे ब्रेड, पास्ता आणि चीज खाणे टाळा.

▮**सूप :** भूक भागण्यासाठी सूप प्या. या वयात नियमित भाज्यांचे सूप तयार करून पिणे सर्वोत्तम आहे.

▮**रात्री हलके जेवा :** रात्री जेवण्याची मात्रा कमी ठेवा. रात्री जेवल्याबरोबर झोपणे टाळा. रात्री कोणत्याही प्रकाराचे स्नॅक्स घेणे टाळा.

▮**त्वचेला उपयुक्त आहार घ्या :** आपण जे काही खातो, त्याचा प्रभाव आपल्या शरीरावर होतो. म्हणून पोषक तत्त्वे आपल्याला निरोगी ठेवण्यात व सुंदरता वाढवण्यात मदत करतात.



▮**प्रदूषणापासून दूर राहा :** स्वतः प्रदूषणमुक्त राहण्याचा प्रयत्न करा. घरातून बाहेर निघताना नाक मास्कने झाकून घ्या. सकाळी शुद्ध हवेत फिरा.

▮**पायी फिरा :** दररोज अर्धा तास तरी पायी फिरा आणि सक्रिय राहा. एकाच जागी बसलात तर आपले पन्नाशीत फिट राहण्याचं स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही.

## झोप येत नसेल, तर हे करून बघा

योग आणि योगासनात बरीच क्षमता आहे. योग करा म्हणजे आजार होणार नाही. आजार गंभीर नसला तरीही योग प्रभावी असू शकतो. आज आम्ही इथे सांगणार आहोत की, रात्री झोप येत नसल्यास केले जाणारे फक्त दोन उपाय; ज्यामुळे आपल्याला शांत झोप येईल.

**झोप न येण्याची कारणं**

**तसे तर झोप न येण्याची अनेक कारणे असू शकतात पण दोन कारणं प्रामुख्यानं असू शकतात जसे की शरीराला थकवा न जाणवणं आणि काळजी किंवा सतत दिवसं रात्र विचार करणं. हीच दोन प्रमुख कारणे आहेत म्हणून त्यासाठी येथे दोन उपाय सांगत आहोत.**

**प्राणायाम**

दररोज झोपण्यापूर्वी किमान ५ ते १० मिनिटे प्राणायाम करावा. आपण योगनिद्रेचा सरावदेखील करू शकता. यासाठी शवासनात झोपून शरीर, मन आणि मेंदूला सैल सोडा. डोक्यापासून पायापर्यंत आपल्या संपूर्ण शरीराला सैल सोडा. पूर्ण श्वास घेऊन सोडायचा आहे. आता असा विचार करा की, आपले हात, पाय, पोट, मान, डोळे सर्व काही सैल झाले आहेत. आता स्वतःला सांगा की, मी योगनिद्रेचा सराव करत आहे.

आता आपल्या मनाला शरीराच्या वेगवेगळ्या भागांकडे हलवा आणि त्यांना सैल आणि तणावरहित असण्याची सूचना द्या. आपल्या मनाला उजव्या पायाच्या अंगठ्यावर घेऊन जा. पायाची सर्व बोटे किमान तळपाय, टाच, पोटऱ्या, गुडघा, मांडी, नितंब, कंबर, खांदा सैलसर होत आहे. अशा प्रकारे डावा पाय देखील सैल सोडा. श्वास घ्या आणि सोडा.

आता झोपल्या झोपल्या ५ वेळा पूर्ण श्वास घ्या आणि सोडा. पोट आणि छाती वर-खाली होणार. पोट वर-खाली होणार. हा सराव दररोज करावा. यामुळे मन थकून झोपून जाणार आणि कोणत्याही प्रकारचा विचार करणार नाही.



**सूचना**

▮दक्षिण दिशेला पाय करून झोपू नका.

▮तामसी जेवण करू नका. रात्री हलकेच जेवण करावं.

▮दिवसात किंवा दुपारी झोपण्याची सवय सोडून द्या.

▮कोणत्याही प्रकारची नशा करू नका.

▮झोपण्यापूर्वी आपली काळजी आणि विचारांना लांब ठेवून झोपा, कारण जेवढे महत्त्वाचे अन्न, पाणी आणि श्वास घेणे आहे, त्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे झोप घेणे.

▮रात्री उशिरापर्यंत जागणे आणि सकाळी उशिरा उठणे सोडा.

▮झोपेची वेळ टाळल्याने झोप कमी होते.

▮झोप बऱ्याच रोगांना स्वतःच ठीक करण्यास सक्षम असते.

▮झोपेच्या अभावामुळे डोळ्याभोवती गडद वर्तुळे बनतात, तसेच डोळ्याभोवती काळपटपणा येतो.

▮कमी झोपल्याने मेंदू थकलेला जाणवतो आणि वजनदेखील वाढते.

**सूर्यनमस्कार**

**शरीराला थकवण्यासाठी झोपण्यापूर्वी १ तास व्यायाम करा किंवा फक्त १५ मिनिटांसाठी सूर्यनमस्कार करा. सूर्यनमस्कार १२ असतात. या सर्व १२ सूर्यनमस्काराची पुनरावृत्ती किमान १२ वेळा करा.**

## फोन चार्ज करण्याचा '४०-८०' नियम माहीत आहे का? कधीच खराब होणार नाही बॅटरी

फोन चार्ज करण्यासाठी एक नियम नक्कीच फॉलो केला पाहिजे, जो '४०-८० चार्जिंग रुल' नावाने ओळखला जातो. या नियमानुसार, फोन ४० टक्क्यांपेक्षा कमी चार्ज होईस्तोवर वाट पाहू नये आणि ८० टक्क्यांपेक्षा जास्त चार्ज देखील करू नये.

सध्या आपण मोबाईल फोनवर खूप जास्त अवलंबून आहोत. आपण याचा वापर काम, मनोरंजन आणि मित्र-कुटुंबाच्या संपर्कात राहण्यासाठी करतो. त्यामुळे फोनची बॅटरी जास्त काळ टिकावी याची काळजी आपण घेतली पाहिजे. एक चांगली पद्धत आहे जी '४०-८० चार्जिंग रुल' नावाने ओळखली जाते. या नियमानुसार, आपण आपला फोन ४० टक्क्यांपेक्षा कमी चार्जिंगवर ठेवू नये आणि ८० टक्क्यांपेक्षा जास्त देखील चार्ज करू नये.

तज्ज्ञांच्या मते, ४०-८० चार्जिंग रुल, ही बॅटरी दीर्घकाळ टिकवण्याची एक चांगली पद्धत आहे. हा नियम असा आहे की फोनची बॅटरी कधीही ४० टक्क्यांच्या खाली उतरू देऊ नये तसेच चार्जिंग करताना कधी फोन फुल चार्ज करू नये तर चार्जिंग ८० टक्क्यांवर ठेवावी.



**डिस्चार्ज-चार्ज सायकल**

लिथियम-आयन बॅटरी जी हल्लीच्या बहुतांश फोन्समध्ये वापरली जाते, या बॅटरीच्या 'डिस्चार्ज-चार्ज सायकल'ची संख्या ठरलेली असते. जेव्हा आपण आपला फोन शून्य टक्क्यांपासून १०० टक्क्यांपर्यंत चार्ज करतो, तेव्हा फोन बॅटरीचा एक डिस्चार्ज-चार्ज सायकल पूर्ण होते. जितके जास्त डिस्चार्ज-चार्ज सायकल आपण आपल्या फोनच्या बॅटरीचे पूर्ण करतो, तेवढ्या लवकरच ती खराब होते. त्यामुळे ४०-८० चार्जिंग रुलचा वापर करून, आपण आपल्या फोनची बॅटरी लाइफ वाढवू शकतो.

**ॲपलने दिले वेगळे उत्तर**

ॲपल डिस्कशन प्लॅटफॉर्मवर बॅटरी हेल्थबद्दल अनेक प्रश्न विचारण्यात आले होते. ॲपलने या प्रश्नाचे उत्तर देताना फोन ८० टक्क्यांपर्यंत चार्ज ठेवावा, असा सल्ला दिला आहे. त्यामुळे बॅटरी हेल्थ चांगली राहते. ॲपलनुसार, वारंवार चार्ज केल्यावर तिची लाइफ वेगाने ढासळू लागते. तसेच फोन २० टक्क्यांपेक्षा खाली चार्ज गेल्यावरच चार्ज केला पाहिजे. विशेष म्हणजे नव्या आयफोनमध्ये कंपनीने एक नवीन फीचर लाँच केले आहे, ज्याचे नाव ऑप्टिमाइज चार्जिंग मोड, ज्यात आयफोन ८० टक्के चार्ज झाल्यावर फोन पॉवर घेणे बंद करतो. त्यामुळे आयफोनची बॅटरी हेल्थ चांगली राहते.

## कापलेला कांदा लगेच वापरा, फ्रीजमध्ये ठेवणे धोकादायक



रोजची घाई नको म्हणून सॅलड करताना किंवा भाजीची तयारी करताना कांदा आधीपासून कापून ठेवण्याची सवय आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. खूप आधीपासून कापून ठेवलेला कांदा खाणे अत्यंत नुकसान करणारे ठरू शकते. तसेच कांदा कापून फ्रीजमध्ये कधीच ठेवू नये.

कारण कांद्यामध्ये आरोग्यासाठी फायदेशीर असे अनेक औषधी गुण, ॲण्टीबॅक्टेरियल, ॲण्टी इन्फ्लमेटरी घटक असतात. पण फ्रीजमध्ये कापलेला कांदा ठेवल्याने त्यामधील घटक नष्ट होतात.

आपण सोयीसाठी कांदा सोलून जरी फ्रीजमध्ये ठेवत असाल तरी ते नुकसानकारक आहे. सोललेला कांदा आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकतो, कारण कांद्याची साले काढल्यानंतर त्याला बॅक्टेरियाचा संसर्ग होण्याची शक्यता अधिक वाढते. यामुळे कांदा ऑक्सिडाईज होतो.

कांदा कापल्यावर किंवा साले काढल्यावर त्यामधील सेल्स तुटून फ्लुईड्स रिलीज होतात. यातील न्यूट्रीएन्ट्सची क्षमता देखील बॅक्टेरियामुळे कमी होते. कोणत्याही वातावरणात कांदा सोलून किंवा चिरून ठेवल्यास त्यातून पाणी वाहायला सुरुवात होते. त्यामुळे यावर बॅक्टेरिया वाढतात. अशात कांदा खाणे आरोग्यासाठी अत्यंत नुकसानकारक ठरू शकते. चिरलेला कांदा बॅक्टेरियांसाठी चुंबकासारखे काम करतो.

अत्यंत गरज भासल्यास आपण कापलेला कांदा पेपर टॉवेलमध्ये गुंडाळून ठेवू शकता. किंवा फ्रीजमध्ये ठेवण्याची गरज भासलीच तर सीलबंद डब्यामध्ये भरून ठेवा. गरज असेल तेव्हाच कांदा कापून आहारात वापरावा.

# महापौरपदाची सोडत चक्राकार पद्धतीने?

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबईच्या महापौरपदासाठी येत्या २२ जानेवारी रोजी आरक्षण सोडत काढली जाणार आहे. ही आरक्षण सोडत नगरसेवक प्रभागाच्या आरक्षणानुसार नव्याने न काढता चक्राकार पध्दतीने काढली जाण्याची शक्यता माध्यमाद्वारे वर्तवली जात आहे. मात्र, चक्राकार पद्धतीने या पदाची आरक्षण सोडत काढली गेल्यास सर्वसाधारण खुर्ला प्रवर्ग वगळता उर्वरीत सर्व प्रवर्गातील एखादे आरक्षण निघू शकते अशाप्रकारची शक्यता आहे. मागील महापौर पदासाठी खुला प्रवर्ग आणि एस सी महिला यासाठीचे आरक्षण निघालेले असल्याने या चक्राकार पद्धतीने एस सी व ओबीसीचे आरक्षण पडले जाण्याची दाट शक्यता आहे. पालिकेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर निवडून आलेल्या सर्व नगरसेवकांची नावे राजपत्रात प्रसिध्द झाली. त्यानुसार काँग्रेस पक्षाच्यावतीने नगसेवकांची नोंदणी कोकण विभागीय आयुक्तांकडे पूर्ण झाली आहे. आता भाजप, शिवसेना आणि अन्य पक्षांमधील निवडून आलेल्या नगरसेवकांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली जाईल. महापौरपदी कोण बसणार याची चर्चा सुरू असली तरी यासाठी कोणत्या आरक्षण प्रवगार्तील महापौर असेल हे निश्चित होणे आवश्यक आहे. त्यानुसार गुरुवारी आरक्षण सोडत काढली जाणार आहे. हे आरक्षण नव्याने न काढता जुन्याच आरक्षणाचा विचार करता चक्राकार पद्धतीने काढले जाणार असल्याचे सांगण्यात आले.

**आतापर्यंत महापौरपदाचे असे होते आरक्षित प्रवर्ग**

- सन २००० : सर्वसाधारण ( हरेश्वर पाटील)
- सन २००२ : एस सी (महादेव देवळे)
- सन २००५ : सर्वसाधारण (दत्ताजी दळवी)
- सन २००७ : ओबीसी महिला (डॉ. शुभा राऊळ)
- सन २००९ : सर्वसाधारण महिला (श्रद्धा जाधव)
- सन २०१२ : सर्वसाधारण (सुनील प्रभू)
- सन २०१४ : एस सी महिला (स्नेहल आंबेकर)
- सन २०१७ : सर्वसाधारण (प्रि विश्वनाथ महाडेश्वर)
- सन २०२० : सर्वसाधारण (किशोरी पेडणेकर)

कशी असते चक्राकार पद्धती : महापौरपदासाठी मागील आरक्षण वगळून अन्य प्रवर्गाचे आरक्षण सोडतीसाठी चिठ्ठी टाकली जाते. त्यामुळे जर मागील महापौर सर्वसाधारण प्रवगार्तील असेल पुढील आरक्षण सोडत काढताना या प्रवगार्चा विचार केला जात नाही. त्या प्रवर्गा व्यतिरिक्त अन्य प्रवगार्तील आरक्षण चिठ्ठ्या लॉटरी सोडतीसाठी टाकल्या जातात.




## मुंबई महानगरपालिकेतील टॉप १० श्रीमंत नगरसेवकांची यादी




**■मुंबई । प्रतिनिधी,**

मुंबई महानगरपालिका निवडणूक २०२६ चे निकाल जाहीर होताच देशातील सर्वात श्रीमंत महापालिकेतील राजकीय ताकद आणि आर्थिक स्थिती पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. मुंबईकरांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अनेक नव्या नगरसेवकांकडे कोट्यवधी रुपयांची संपत्ती असल्याचे समोर आले असून, महापालिकेतील 'श्रीमंत नगरसेवकांची यादी' लक्ष वेधून घेत आहे. विशेष म्हणजे, या टॉप १० श्रीमंत नगरसेवकांमध्ये भाजपच्या उमेदवारांची संख्या अधिक असल्याचं पाहायला मिळालं आहे. निवडणूक निकालानुसार भाजपने ८९ जागा जिंकत महापालिकेत सर्वात मोठा पक्ष म्हणून आपले स्थान मजबूत केले आहे. याच पार्श्वभूमीवर संपत्तीच्या बाबतीतही भाजपचे नगरसेवक आघाडीवर असल्याचे चित्र आहे.दरम्यान, पक्षनिहाय पाहणी केली असता टॉप १० श्रीमंत नगरसेवकांमध्ये भाजपचे 5 नगरसेवक आहेत. शिवसेना (ठाकरे गट) आणि शिवसेना (शिंदे) यांचे प्रत्येकी २ नगरसेवक असून, काँग्रेसचा १ नगरसेवक या यादीत आहे.

**टॉप १० श्रीमंत नगरसेवकांची यादीः**

- मकरंद नार्वेकर (भाजप) – १२४ कोटी रुपये
- चंदन शर्मा (भाजप) – ८४ कोटी ७७ लाख ९९ हजार ६३५ रुपये
- हर्षिता नार्वेकर (भाजप) – ६३ कोटी रुपये
- मिनल तुर्डे (शिवसेना शिंदे गट ) – ५५ कोटी १७ लाख ५० हजार ८४२ रुपये
- तुलिप मिरांडा (काँग्रेस) – ५० कोटी ६९ लाख ७० हजार १५० रुपये
- श्रद्धा जाधव (शिवसेना ठाकरे गट) – ४६ कोटी ३४ लाख ७२ हजार ७४३ रुपये
- अनिता वैती (भाजप) – २८ कोटी ८८ लाख १० हजार रुपये
- हेतल गाला (भाजप) – २७ कोटी ९३ लाख ४० हजार २८१ रुपये
- यशोधर फणसे (शिवसेना ठाकरे गट) – २५ कोटी ८४ लाख ९२ हजार २४० रुपये
- भास्कर शेट्टी (शिवसेना शिंदे गट ) – २५ कोटी 37 लाख 26 हजार रुपये

## माघी श्रीगणेशोत्सव २०२६ करता कृत्रिम तलावांसह विविध सुविधा सज्ज



**■मुंबई । प्रतिनिधी,**

माघी श्रीगणेशोत्सव २२ जानेवारी २०२६ पासून साजरा करण्यात येणार आहे. हा उत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यात यावा, यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून श्रीगणेशोत्सव मंडळांसाठी 'तात्पुरता मंडप उभारणी' परवानगीकरिता ऑफलाईन पद्धतीने एक खिडकी योजना सुरू करण्यात आली आहे. तसेच मंडप उभारणी परवानगीसाठी १०० रुपये इतके नाममात्र शुल्क आकारण्यात आले आहे. दरम्यान, उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार नैसर्गिक जलस्रोतांचे प्रदूषण टाळण्यासाठी श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन नद्या, समुद्र, तलाव किंवा इतर नैसर्गिक पाणीसाठ्यांमध्ये न करता; महानगरपालिकेने उपलब्ध करून दिलेल्या कृत्रिम तलावांमध्येच करावे, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाकडून सर्व सार्वजनिक श्रीगणेशोत्सव मंडळे व भाविकांना पुन्हा एकदा करण्यात येत आहे. माघी श्रीगणेशोत्सवात श्रीगणेश मूर्तींचे विसर्जन पर्यावरणपूरक, सुरक्षित आणि सुरळीत पद्धतीने पार पडावे, यासाठी महानगरपालिकेच्या वतीने सर्व आवश्यक उपाययोजना व अतिरिक्त सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर 'महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ' तसेच 'केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ' यांनी जारी केलेल्या सुनिश्चित कार्यपद्धती व मार्गदर्शक सूचनांची काटेकोर अंमलबजावणीही सुयोग्य प्रकारे करण्यात येत आहे. ६ फुटांपर्यंत उंचीच्या मूर्तींचे विसर्जन करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात येणार आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सुनिश्चित कार्यपद्धतीनुसार रंगीत रसायने, थमाकील, प्लास्टिक, कापड, फुले, हार, सजावटीचे साहित्य इत्यादी घटक पाण्यात विसर्जित करण्यास बंदी आहे. त्यामुळे सार्वजनिक मंडळांनी तसेच भाविकांनी निर्माल्य हे निर्माल्य कलशातच टाकावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## पहाटे घर सोडल्यानंतर तिघींचा नाही पत्ता... ३ दिवसांपासून बेपत्ता... ठाणे पोलिसांचं पथक लखनऊला रवाना

**पोलिसांचं आवाहन**

पोलिसांनी या प्रकरणात अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. तसेच, अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, घरातून अचानक बेपत्ता झालेल्या मुली अल्पवयीन असून त्यांचा शोध घेण्यासाठी सर्व बाजूंनी तपास केला जात आहे. तसेच, जर कोणाला या तीन अल्पवयीन मुलींबद्दल काही माहिती मिळाली तर त्यांनी तात्काळ जवळच्या पोलिस ठाण्यात कळवावे, असं पोलिसांनी सर्वसामान्य जनतेला आवाहन केलं आहे.

**■ठाणे। प्रतिनिधी,**

ठाण्यातून तीन अल्पवयीन मुली अचानक बेपत्ता झाल्याचं प्रकरण उघडकीस आलं आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, कल्याणच्या खडकपाडा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या बारावे गावातील रहिवासी असलेल्या दोन सख्ख्या बहिणी आणि त्यांची १३ वर्षीय भाजी सोमवारी सकाळच्या सुमारास घरातून बाहेर पडल्या होत्या. त्यानंतर, त्या तिघींचा काहीच पत्ता लागला नाही. दोघी बहिणींपैकी एक १३ वर्षीय तर दुसरीचं वय १४ वर्षे असल्याची माहिती समोर आली आहे.

**सोमवारी पहाटे घरातून बाहेर पडल्या अन्...**

मिळालेल्या माहितीनुसार, या तिन्ही मुली सोमवारी जवळपास ५.३० वाजताच्या सुमारास घरातून बाहेर पडल्या होत्या. मात्र, त्यानंतर त्या घरी परतल्याच नाहीत.कुटुंबियांनी आजूबाजूच्या परिसरात त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तसेच, नातेवाईक आणि ओळखीच्या लोकांकडेही चौकशी केली, पण कोणतीही माहिती मिळाली नाही. बराच वेळ त्या तिघींचा काहीच पत्ता न लागल्याने कुटुंबियांनी खडकपाडा पोलीस स्टेशनमध्ये मुली बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवली.



**लखनऊला पोलीस पथक पाठवण्यात आलं**

प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आणि तिघींचा शोध घेण्यास सुरूवात केली. यासंदभार्तील महत्त्वाच्या माहितीच्या आधारे, त्या मुली उत्तर प्रदेशातील लखनऊमध्ये असण्याची शक्यता असल्याचं पोलिसांना कळलं. ही माहिती मिळाल्यानंतर, लखनऊला एक विशेष पोलिस पथक पाठवण्यात आले आहे, जे स्थानिक पोलिसांच्या मदतीने मुलींचा शोध घेत आहे.

## १३ ट्रान्सजेंडरपैकी सात जणांना तुरुंगात एचआयव्हीची बाधा, एकजण निघाला पुरुष, म्हणाला, पैशांसाठी...

**■मुंबई । प्रतिनिधी,**

उत्तर प्रदेशातील प्रतापगड जिल्हा कारागृहातून एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एचआयव्हीची चाचणी केल्यानंतर एक दोन नाहीतर तब्बल १३ ट्रान्सजेंडरपैकी सात जणांना एचआयव्हीची बाधा झाल्याचं आढळून आलं. यापैकी एक पुरुष असल्याचं सांगण्याच येत आहे. यामुळे तुरुंग प्रशासन आणि आरोग्य विभागाला मोठा धक्का बसला आहे. परिस्थिती पाहता तुरुंगात सुरक्षा वाढवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. ही बाब सध्या देशात चिंतेचा विषय ठरत आहे.



**ट्रान्सजेंडर लोकांमध्ये एचआयव्हीची बाधा**

दरम्यान, प्राथमिक तपासातून सात ट्रान्सजेंडर लोकांमध्ये एचआयव्हीची बाधा झाल्याचं आढळून आल्याची वस्तुस्थिती आहे. रक्ताचे सर्व नमुने देखील प्रयोगशाळेत तपासणीस पाठवले गेले होते. सध्या, सर्व बाधीत रुग्णांना इतर कैद्यांपासून वेगळं ठेवण्यात आलं. तर दुसरीकडे इतर कैद्यांना आयसोलेशन बॅरेकेटमध्ये हलवले आले होते.

**ट्रान्सजेंडर समुदायात दोन गटांमध्ये वाद**

ही घटना कोतवाली परिसरातील अचलपूर येथे घडली आहे. रविवारी ट्रान्सजेंडर मिस्बा आणि अंजली या दोन गटांमध्ये मोठा राडा झाला होता. त्यांच्या वादाला हिंसक वळण प्राप्त झाल्याचं चित्र दिसून आलं. पोलिसांनी कडक कारवाई करत दोन्ही बाजूंच्या १३ जणांविरोधात एफआरआय दाखल करण्यात आला होता. तुरुंगाच्या नियमावलीनुसार आरोपींची तपासणी केली जाणार असता, रिपोर्ट लवकरच येण्याची शक्यता वर्तवली आहे. या घटनेची माहिती देशभरात पसरली आहे.

**१३ पैकी एक व्यक्ती पुरुष**

यामध्ये १३ पैकी १२ हे ट्रान्सजेंडर असून एक व्यक्ती हा पुरुष असल्याने पुरुष देखील षंढ म्हणून काम करतात का? असा प्रश्न उपस्थित केला आहे. स्थानिकांचा असा विश्वास आहे की, जास्त कमाईच्या आमिषामुळे अनेक तरुण देखील तृतीयपंथियांच्या समुदायात सामील होताना दिसत आहेत.


## लग्नानंतर पत्नीचे दोन तरुणांसोबत संबंध, विरोध केल्यावर धमक्या आणि छळ

**■मुंबई । प्रतिनिधी,**

उत्तर प्रदेशच्या मुरादाबाद येथील ठाकूरद्वारा परिसरातून अनैतिक संबंधाचं धक्कादायक प्रकरण उघडकीस आलं आहे. येथील सिव्हिल कोर्टात स्टेनो म्हणून कार्यरत असलेल्या मोहित नावाच्या तरुणाचं २०२३ मध्ये ज्योती (बदललेलं नाव) नावाच्या तरुणीसोबत लग्न झालं होतं. मात्र, लग्नानंतर त्यांच्या नात्यात कालांतराने दुरावा निर्माण होऊ लागला आणि अखेर मोहितने आपलं आयुष्य संपवलं. नेमकं प्रकरण काय?

**लग्नानंतर दोन पुरुषांसोबत अनैतिक संबंध**

मिळालेल्या माहितीनुसार, लग्नानंतर मोहितच्या पत्नीचे दोन तरुणांसोबत प्रेमसंबंध निर्माण झाले आणि तिने दोघांसोबत शारीरिक संबंध देखील प्रस्थापित केल्याचा आरोप आहे. त्यानंतर, तिघांनी मिळून मोहितचा शारीरिक आणि मानसिक छळ करण्यास सुरूवात केली. शेवटी, या सगळ्याला वैतागून मोहितने फाशी घेत आयुष्य संपवल्याचं सांगितलं जात आहे. आता, मृताच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी मोहितची पत्नी आणि तिच्या दोन प्रियकरांसह १२ लोकांविरुद्ध आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याच्या आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल केला आहे.



**मृताच्या वडिलांनी केला आरोप**

तक्रारीत मृताच्या वडिलांनी आरोप केला की मोहितने २०२३ मध्ये नर्स म्हणून कार्यरत असलेल्या एका तरुणीसोबत लग्न केलं. लग्नानंतर काही काळातच तिचे एका डॉक्टरसोबत आणि नंतर, दुसऱ्या पुरुषाशी प्रेमसंबंध सुरू झाले. मोहितला आपल्या पत्नीच्या विवाहबाह्य संबंधाची माहिती मिळाली. यासाठी मोहितने विरोध केला असता पत्नीने तिच्या प्रियकर आणि सासरच्या लोकांसह मोहितला धमकावण्यास सुरुवात केली. त्यांनी मिळून त्याचा शारीरिक आणि मानसिक छळ केला. पत्नीच्या याच वागण्याला वैतागून पीडित पतीने आत्महत्या केली.

पोलिसांच्या माहितीनुसार, मोहितच्या मृतदेहाजवळ सुसाइड नोट देखील सापडली असून ती ताब्यात घेण्यात आली आहे. या नोटमध्ये शारीरिक आणि मानसिक छळ झाल्याचं त्याने नमूद केलं आहे. आता, पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन तो पोस्टमॉर्टमसाठी पाठवला असून पोलीस या संपूर्ण प्रकरणाचा तपास करत आहेत. तसेच, आरोपींवर योग्य ती कारवाई केली जाणार असल्याचं देखील पोलिसांनी आश्वासन दिलं.

## प्रेम विवाह केला पण पत्नीचे इंजिनिअरिंगच्या २ विद्यार्थ्यांसोबत अनैतिक संबंध

**■मुंबई । प्रतिनिधी,**

कानपूरच्या महाराजपूर परिसरातून एक धक्कादायक हत्या प्रकरण समोर आले आहे. प्रेमविवाहानंतर अवघ्या चार महिन्यांतच पतीने पत्नीची गळा दाबून हत्या केल्याची घटना घडली आहे. या घटनेनंतर आरोपी पती स्वतः पोलीस ठाण्यात हजर झाला आणि पत्नीची हत्या केल्याची माहिती पोलिसांना दिली. या प्रकारामुळे संपूर्ण परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर कुणीतरी पोलिसांना कळवले. त्यानंतर पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात नेले. तेथे सचिनने समझोत्याची भूमिका घेतल्याने पोलिसांनी त्याला सोडून दिले. मात्र, घरी परतल्यानंतर श्वेताने पकडण्यात आलेल्या तरुणांची सुटका करण्यासाठी दबाव टाकण्यास सुरुवात केली. याच कारणावरून पुन्हा एकदा दोघांमध्ये तीव्र वाद झाला. या वादातूनच संतप्त झालेल्या सचिनने श्वेताचा गळा दाबून तिची हत्या केली. हत्या केल्यानंतर तो थेट पोलीस ठाण्यात पोहोचला आणि पत्नीची हत्या केल्याची माहिती पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले. खोलीत गुंडाळलेला श्वेताचा मृतदेह आढळून आला. पोलिसांनी आरोपी सचिन सिंह याला ताब्यात घेतले असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू केला आहे.



**अनेक वर्षांपासूनचे प्रेमसंबंध, कोर्टात लग्न, पण चार महिन्यांनंतर हत्या**

फतेहपूर जिल्ह्यातील रहिवासी सचिन सिंह आणि श्वेता सिंह यांचे गेल्या अनेक वर्षांपासून प्रेमसंबंध होते. कुटुंबीयांचा विरोध असतानाही दोघांनी चार महिन्यांपूर्वी कोर्टात जाऊन विवाह केला होता. विवाहानंतर सुरुवातीला दोघे गुजरातमध्ये राहत होते. त्यानंतर ते कानपूरला आले आणि गेल्या एक महिन्यापासून महाराजपूर परिसरात भाड्याच्या खोलीत वास्तव्यास होते. अधिकची माहिती अशी की, कानपूरमध्ये आल्यानंतर सचिन सिंह ऑटो रिक्षा चालवण्याचे काम करू लागला. त्याने एका अभियांत्रिकी महाविद्यालयाजवळील इमारतीत खोली भाड्याने घेतली होती. त्या इमारतीत तसेच आजूबाजूच्या परिसरात अभियांत्रिकीचे अनेक विद्यार्थी वास्तव्यास होते. सचिनच्या म्हणण्यानुसार, तो ऑटो चालवण्यासाठी बाहेर जात असताना श्वेताचे इतर तरुणांशी संबंध निर्माण झाल्याचा त्याला संशय होता. या संशयामुळे दोघांमध्ये वारंवार वाद होत असल्याचेही समोर आले आहे. शुक्रवारी रात्री सचिन अचानक घरी परतला. त्यावेळी खिडकीतून डोकावून पाहिल्यानंतर त्याला पत्नी श्वेता दोन अभियांत्रिकी विद्यार्थ्यांसोबत पलंगावर झोपलेली दिसली. हे दृश्य पाहून सचिनचा संतापला. यानंतर खोलीत जोरदार वाद झाला. या वादादरम्यान श्वेताने त्या तरुणांकडून सचिनला मारहाण करवून घेतल्याचा दावा आरोपीने पोलिसांसमोर केला आहे.

## फ्लॅटमध्ये पोलिसांचा छापा, दारूच्या बाटल्यांसह आढळले वापरलेले कंडोम... नवरा-बायकोचे कारनामे चव्हाट्यावर

**■मुंबई । प्रतिनिधी,**

एका पाच मजली इमारतीच्या फ्लॅटमध्ये पती-पत्नी सेक्स रॅकेट चालवत असल्याचं सांगण्यात येत आहे. गेल्या दोन वर्षांपासून या सेक्स रॅकेटबद्दल कोणालाही माहिती नव्हती. कॉलनीतील रहिवाशांना हळूहळू संशय येऊ लागला होता. परिणामी त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली. पोलिसांनी येऊन फ्लॅटवर छापा टाकत खोलीतील दृश्य बघून ते थक्क झाले होते. फ्लॅटमध्ये वापरण्यात आलेले कंडोम, दारूच्या बॉटल्या पडलेल्या होत्या. यामुळे परिसरात भीतीचं वातावरण पसरलं होतं. तथापि पोलिसांनी घटनास्थळी सेक्स रॅकेट चालवणाऱ्यांना अटक केली. अशातच हे सेक्स रॅकेट चालवणाऱ्या महिलेचा पती फरार आहे. पोलीस या प्रकरणाचा शोध घेत आहेत.

**खोलीत कंडोमची पाकिटं अन् दारूच्या बाटल्या**

एका ५ मजली इमारतीच्या फ्लॅटमध्ये सेक्स रॅकेटचं काम सुरु होतं. जो हे रॅकेट चालवत होता त्याचं नाव सय्यद समीर सिद्दीकी असं होते, पण जेव्हा पोलिसांनी घटनास्थळी छापा मारला असता, हे प्रकरण समोर आलं. तेव्हा एक महिला ही खोलीत नग्न अवस्थेत होती आणि तिथेच एक कस्टमर देखील होता. तेव्हा पोलिसांनी सेक्स रॅकेट चालवणाऱ्या साथीदार मोहम्मद वसीमला आपल्या ताब्यात घेतलं होतं. तपासादरम्यान, पोलिसांना खोलीत कंडोमची पाकिटं आढळून आली होती, तसेच दारूच्या बॉटल्या देखील आढळून आल्या होत्या.



**स्पा सेंटर नावाने सेक्स रॅकेट...**

या घटनेनं परिसर हादरून गेला होता. सय्यद समीर सिद्दीकी हा स्पा सेंटरच्या नावाने सेक्स रॅकेट चालवायचा. ग्राहकांच्या रोजच्या गर्दीमुळे परिसरातील लोकांना संशय आला. सय्यदवर आधीच अनेक गुन्हेगारी रेकॉर्ड दाखल आहेत. पोलीस त्याचा शोध घेत आहेत. हे प्रकरण चर्चेचा विषय ठरत आहे.

**पोलिसांचा फ्लॅटमध्ये छापा, खोलीत तरुणासह महिला नग्न अवस्थेत, सर्वत्र कंडोम, समीर सय्यद पत्नीसोबत...**

एका मोठ्या सेक्स रॅकेटचा पोलिसांनी पदार्फाश केल्याची घटना उघडकीस आली आहे. एका पाच मजली इमारतीच्या फ्लॅटमध्ये सुरु असलेल्या सेक्स रॅकेटचा पदार्फाश करण्यात आला. पोलीस पथकाने इमारतीच्या संबंधित फ्लॅटमध्ये प्रवेश केल्यानंतर एक तरुण आणि एक महिला नग्न अवस्थेत आढळून आली. त्यांच्याकडे कंडोमची पॅकेट आणि दारूच्या बाटल्या देखील आढळून आल्या होत्या. या प्रकरणासंदर्भात पोलिसांनी ऑपरेटर आणि इतर तिघांना अटक केली. ऑपरेटर आणि तिचा पती सय्यद समीर यांच्या देखरेखीखाली संपूर्ण सेक्स रॅकेट चालवले जात होते. यामुळे या सेक्स रॅकेटचा पदार्फाश झाला. ही घटना वाराणसीतील आझादनगर कॉलनीतील पाच मजली फ्लॅटमध्ये सुरु असलेल्या सेक्स रॅकेटचा पदार्फाश करण्यात आला आहे.

**खोलीत कंडोमचे पाकिट विखुरलेल्या अवस्थेत**

पोलिसांच्या पथकाने परिसराला वेढा घालत फ्लॅटमध्ये प्रवेश केला. नंतर पोलिसांना पाहताच घटनास्थळी एकच गोंधळ उडाला. फ्लॅटमधील दृश्य पाहून पोलिसही हादरून गेले आहेत. खोलीत कंडोमचे पाकिट विखुरलेल्या अवस्थेत आढळून आले होते. तर काही वापरण्यात आलेले कंडोमही जमिनीवर पडले होते. पोलिसांना काही दारूच्या बाटल्या देखील सापडल्या होत्या.

**'त्या' व्यक्तीच्या देखरेखीखाली सेक्स रॅकेट**

हे सेक्स रॅकेट सय्यद समीरच्या देखरेखीखाली चालवले जात होते. सेक्स रॅकेटचालक आणि तिचा पती सय्यद समीर हे आझादनगर कॉलनीत पाच मजली फ्लॅटमध्ये स्पा सेंटर चालवण्यात आले होते. हळूहळू त्यांनी ते वैश्याव्यवसायाच्या अड्ड्यात रुपांतरीत केले. मिडिया रिपोर्टनुसार असा दावा केला की, हे सेक्स रॅकेट दोन वर्षांपासून सुरु होते. यामुळे परिसरात रहिवाशांना हळूहळू संशय आला आणि त्यांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली. पोलिसांच्या पथकाने शोध घेत छापा टाकत सेक्स रॅकेटचा पदार्फाश केला होता.

सय्यद समीर हा ऑपरेटरचा पती असल्याचे सांगितले जाते आणि सध्या तो फरार आहे. पोलीस तपासात सय्यदचा गुन्हेगारी इतिहास समोर आला आहे. वाराणसीतील कॅन्टोन्मेंट, सिग्रा आणि भेलुपूर पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध दरोडा आणि हल्ल्याचे अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. पोलीस आता त्याच्या इतर गुन्हेगारी रेकॉर्डची चौकशी करत आहेत.

**वाईट आणि बेकायदेशीर केलेल्या कृत्याने नागरिकांना धक्का**

दरम्यान, आझादनगरसारख्या वसाहतीत अशा वाईट आणि बेकायदेशीर केलेल्या कृत्याने नागरिकांना धक्का बसला आहे. या प्रकरणात पोलिसांनी अटक केली आहे. आरोपीवर अनैतिक तस्करी कायदा आणि इतर संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करत कायदेशीर कारवाई सुरु करण्यात आली आहे. दरम्यान, फरार सय्यद समीरला पकडण्यासाठी पोलीस पथक छापे टाकत आहेत. पोलीस सध्या आरोपी महिला आणि अटक करण्यात आलेल्या तरुणाची आणि महिलेची चौकशी करत आहेत, त्यांच्या मागील गुन्हेगारी रेकॉर्डची चौकशी देखील करण्यात येत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधीन राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by Dr. Mr. Deepak Moreshwar Naik. Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com